रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २५३
www.ramprahar.com

◆ बुधवार, १ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

वाशीत 'उमेद'मध्ये सहा कोटींची विक्रमी उलाढाल/२
कोपरखैरणेतून साडेअकरा लाखांचे ड्रग्ज जप्त/६
रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत उरण संघाची बाजी/८

## रेडी रेकनर दर 'जैसे थे'! घर खरेदीदारांना दिलासा



**मुंबई :** नवीन घर घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या नागरिकांना राज्य सरकारने एक सुखद वार्ता दिली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रेडी रेकनरच्या दरांमध्ये कोणतीही वाढ न करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. यामुळे १ एप्रिल २०२६पासून लागू होणारे रेडी रेकनरचे दर 'जैसे थे' राहणार असून सामान्यांच्या खिशावर पडणारा अतिरिक्त मुद्रांक शुल्काचा बोजा आता टळणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत मंगळवारी (दि.३१) घोषणा केली. गेल्या काही वर्षांपासून जागतिक आर्थिक परिस्थिती आणि बांधकाम साहित्याच्या वाढलेल्या किमतींमुळे हे क्षेत्र आव्हानात्मक स्थितीतून जात आहे. या पार्श्वभूमीवर क्रेडाईसह विविध संघटनांनी दर न वाढविण्याची विनंती शासनाकडे केली होती. जनहिताचा विचार करून शासनाने यंदा दरवाढीची टक्केवारी 'निरंक' ठेवली आहे.

# भोंदू खरातचा पाय आणखी खोलात!

### शिर्डीत जमीन फसवणूकप्रकरणी गुन्हा दाखल

**शिर्डी : प्रतिनिधी**

शिर्डीत एका शेतकऱ्याची चार एकर जमीन बळकावल्याप्रकरणी भोंदूबाबा अशोक खरात, त्याची पत्नी व इतर तिघे अशा एकूण पाच जणांविरुद्ध फसवणूक व सावकारी कायद्यानुसार शिर्डी पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यात पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

अरविंद बावके (रा. साकुरी, राहाता) आणि किरण सोनवणे (रा. शिर्डी) असे अटक केलेल्यांची नावे आहेत. या दोन्ही आरोपींना न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबत शेतकरी रावसाहेब गोंदकर यांनी शिर्डी पोलिसांकडे दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, आर्थिक अडचणीमुळे मी २०१९मध्ये एका पतसंस्थेकडून १५ लाखांचे कर्ज घेतले होते. कर्जाची परतफेड न झाल्याने मित्र किरण सोनवणे याने मोठे कर्ज उभे करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार २०२१मध्ये विविध जमिनींची कागदपत्रे एकत्र करून पुन्हा पतसंस्थेने सुमारे एक कोटी ३० लाखांचे कर्ज मंजूर केले. कर्जाची परतफेड न झाल्याने व्याजासह ही रक्कम दोन कोटी पाच लाखांवर पोहचली.

दरम्यान, कर्ज फेडण्यासाठी सोनवणे याने अशोक खरातशी संपर्क साधला. या बैठकीत जमिनीची तीन कोटींच्या व्यवहाराची बोलणी झाली, मात्र



या जमीन गहाण ठेवण्याऐवजी थेट खरेदीखत करण्याचा दबाव टाकण्यात आला. २३ ऑगस्ट २०२३ रोजी राहाता येथील दुय्यम निबंधक कार्यालयात चार एकर जमीन खरातच्या नावावर खरेदीखत करून देण्यात आली. व्यवहारानुसार एकूण सात कोटी सात लाख रुपयांचा करार दाखवण्यात आला.

व्यवहार केल्यानंतर खरातने मला तीन कोटी रुपयांची गरज असताना ते प्रती महिना दोन टक्के व्याजाने पैसे देऊन तसेच त्या व्यतिरिक्त आणखी दोन कोटी ५३ लाख रुपये देऊन तेच पुन्हा व्याज म्हणून त्यापैकी एक कोटी ६४ लाख सोनवणे व बावके यांच्यामार्फत घेतले. मी व्याजाचे पैसे परत केले असतानादेखील उर्वरित पैसे हिशोब करून परत देण्याबाबत व माझी जमीन माझ्या नावावर करून घेण्याचा प्रयत्न केला असता खरात व त्याची पत्नी व बावके यांनी टाळाटाळ केली. आजपर्यंत व्यवहार पूर्ण न करता त्यांनी माझी फसवणूक केली आहे, असे तक्रारदार गोंदकर यांनी म्हटले आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### पत्नी फरार, मुलगा ताब्यात

**नाशिक :** अनेक महिलांचे लैंगिक शोषण केलेल्या अशोक खरात प्रकरणात आता आणखी ट्विस्ट समोर येत आहेत. अशोक खरातची पत्नी कल्पना खरात फरार झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. कल्पनावर आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर ती फरार झाली आहे. तिच्या अटकेसाठी पोलीस पथके रवाना झाली आहेत. दुसरीकडे अशोक खरातचा मुलगा हर्षवर्धनला एसआयटीने चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

## आजपासून माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

ग्रामीण आरोग्यसेवा अधिक सक्षम व स्वयंपूर्ण करण्याच्या उद्देशाने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या अभियानास बुधवार (दि.१)पासून प्रारंभ होणार आहे. हे अभियान ३१ मार्च २०२७पर्यंत राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत बुधवारी विशेष आरोग्य ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार आहे.

गाव पातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्यसेवांना चालना देण्यासाठी, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत बदल व आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरणार




असून सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधनासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनवणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या अभियानांतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊच नयेत याबाबतच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता-बाल आरोग्य सुधारणे, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन व मानसिक आरोग्य यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी सर्व ग्रामपंचायत सरपंच, आरोग्य अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना "आरोग्यसंपन्न गाव" म्हणून घोषित करण्यात येईल. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

## राजिपमध्ये १३ आरोग्यसेवकांना नियुक्तीपत्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरळ सेवा भरती २०२३-२४ अंतर्गत आरोग्यसेवक पुरुष ४० टक्के संवर्गातून अतिरिक्त निवड सूचीमधून सात तसेच आरोग्य सेवक ५० टक्के संवर्गातून सहा अशा एकूण १३ उमेदवारांना सोमवारी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर उपस्थित होत्या.

सरळसेवा भरती सन २०२३-२४ अंतर्गत जिल्हा निवड मंडळाने मंजुरी दिलेल्या आरोग्यसेवक (पुरुष)



४० टक्के व आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के संवर्गातील अतिरिक्त अंतिम निवडसूचीमधून एकूण १३ उमदेवारांना नियुक्ती आदेश देण्यांत आले. यामध्ये ४० टक्के संवर्गातून वैभव डोंगरे यांना उपकेंद्र मजगाव-माणगाव, श्रीकृष्णा वाईकर यांना उपकेंद्र हमरापूर-पेण, विनय कदम व प्रशांत दुधमल यांना उपकेंद्र वेळास-श्रीवर्धन, सागर वेहेळे यांना उपकेंद्र चौक-खालापूर, अनंता वायाळ उपकेंद्र निजामपूर-महाड, अजयसिंह सावंत भोसले यांना उपकेंद्र दासगाव-महाड येथे नियुक्त करण्यात आले आहे.

५० टक्के संवर्गातून साकिब पटेल यांना उपकेंद्र आचळोली-महाड, किरण किर्तने यांना उपकेंद्र मोठे शहापूर-अलिबाग, जगदिश सुलाने यांना उपकेंद्र खारआंबोली-मुरूड, प्रकाश शिंदे यांना उपकेंद्र मांघरुण-महाड, अमोल जाधव यांना उपकेंद्र नेवरुळ-म्हसळा, राजेंद्र जोनवाल यांना उपकेंद्र वेळास-श्रीवर्धन येथे नियुक्त करण्यात आले आहे.

या सर्व १३ उमेदवारांना नियुक्ती आदेश रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते सोमवारी देण्यात आले. सर्व नियुक्त उमेदवारांचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनीही अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**पनवेल : भाजपप्रणित अखिल भारतीय माथाडी कामगार संघटनेच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कामगारांनी स्थापन केलेल्या भाजपच्या युनियन सचिवपदी नियुक्ती झाल्यानंतर प्रभूदास भोईर यांनी मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. सोबत सुरेशशेठ भोईर व अन्य होते.**

## निवडक

### बिहारच्या मंदिरात चेंगराचेंगरी; आठ भाविकांचा मृत्यू

**पाटणा :** बिहारमधील नालंदा जिल्ह्यात माघरा येथील शीतला मंदिरात मंगळवारी (दि.३१) सकाळी झालेल्या चेंगराचेंगरीत आठ भाविकांचा मृत्यू झाला असून १० ते १२ भाविक जखमी झाले आहेत. त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांच्या कुटुंबियांना आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून प्रत्येकी चार लाख रुपये आणि मुख्यमंत्री मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय पीएमएनआरएफतर्फे प्रत्येक मृताच्या कुटुंबाला दोन लाख रुपयांची सानुग्रह रक्कम, तर जखमींना ५० हजार रुपये दिले जातील.

### प्रख्यात टेनिस खेळाडू लिएंडर पेस भाजपमध्ये

**नवी दिल्ली :** भारताचा माजी टेनिसपटू लिएंडर पेस याने मंगळवारी (दि.३१) तृणमूल काँग्रेसमधून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू आणि भाजप नेते सुकांत मजूमदार यांच्या उपस्थितीत पेसने अधिकृतपणे भाजपचे सदस्यत्व स्वीकारले. कोलकाता आणि गोवा या दोन्ही राज्यांमध्ये त्याची लोकप्रियता आहे.



**तिरुवनंतपूरम : भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी केरळम विधानसभा निवडणुकीदरम्यान कासारगोड मतदारसंघातील एडनीर मठाला भेट दिली आणि मठाचे पीठाधिपती श्री श्री सच्चिदानंद भारती स्वामी यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केले. यावेळी आमदार राजेश नाईक यांच्यासह नगरसेवक संतोष शेट्टी, जयंत पगडे, श्री. जयचंद्रन, गणेश शेट्टी, रामन्ना शेट्टी, अभिजित शेट्टी उपस्थित होते.**

## वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण फेरबदल करत राज्य सरकारने मंगळवारी (दि.३१) एकाचवेळी १० वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या आहेत. या बदल्यांमध्ये विविध महत्त्वाच्या विभागांतील पदांवर नव्या नियुक्त्या करण्यात आल्या असून प्रशासनात कार्यक्षमता वाढवण्याचा प्रयत्न दिसून येत आहे.

यामध्ये विशेष लक्षवेधी बदल म्हणजे अश्विनी भिडे यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती. त्या यापूर्वी मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव पदावर कार्यरत होत्या. त्यांच्या जागी १९९३ बॅचचे वरिष्ठ अधिकारी लोकेश चंद्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चंद्रा यापूर्वी महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते.

## मुरूडमध्ये कनिष्ठ अभियंता लाच घेताना जाळ्यात

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथे सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर काम करणाऱ्या श्रद्धा दिलीप बोऱ्हाडे यांना अडीच लाखांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

एका ठेकेदाराने मुरूड शहराजवळ असणाऱ्या एकदरा, राजपुरी, खोकरी येथील रस्त्यालगत स्लॅब ड्रेनचे काम पूर्ण केले होते. या कामाचे पूर्ण बिल अंदाजपत्रकसह तयार करून देण्याकरिता कनिष्ठ अभियंता श्रद्धा बोऱ्हाडे यांनी तक्रारदार यांच्याकडून सर्व प्रथम तीन लाख रुपये मागितले. त्यानंतर तडजोड होऊन दोन लाख ५० हजार रुपये देण्याचे ठरले. दरम्यान, याबाबत तक्रारदार यांनी अलिबाग येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारीची शहनिशा केल्यानंतर मुरूड येथील सार्वजनिक बांधकाम कार्यालयात सापळा रचून श्रद्धा बोऱ्हाडे यांना अडीच लाखांची लाच तक्रारदार यांच्याकडून स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई अलिबागमधील रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले, निरीक्षक निशांत धनवडे, नारायण सरोदे, विनोद जाधव, अरुण करकरे, महेश पाटील, सुमित पाटील, सचिन आरपाडकर, नवदित नांदगावकर, मोनिका मोरे यांच्या पथकाने केली. जर कुणी कोणत्याही कामासाठी लाच मागितली, तर संपर्क साधावा, असे आवाहन या विभागाने केले आहे.



## पोलादपूरमध्ये अवकाळी पाऊस

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील लहुळसे गावासह परिसरात अवकाळी वादळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून तापमान वाढत असताना काहीसा दिलासा मिळाला.

निसर्गरम्य लहुळसे गाव देवळे ग्रामपंचायत हद्दीत वसलेले असून येथे ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी अनेक उपक्रम गेल्या काही वर्षांपासून हाती घेण्यात आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून या परिसरात अंगाची काहिली होण्याइतपत वातावरणात उष्मा निर्माण झाला होता. त्यानंतर सोमवारी पावसाच्या सरी बरसल्या.

## कबड्डीपटूंना स्पोर्ट किटचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या अनुषंगाने रायगड जिल्हा पुरुष व महिला संघातील प्रत्येक खेळाडूला श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने संपूर्ण स्पोर्ट किट प्रदान करण्यात आले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने हे स्पोर्ट किट देण्यात आले. खेळाडूंना दर्जेदार क्रीडा साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या तयारीस चालना देण्याचा यामागे उद्देश होता.

यावेळी आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, संघ व्यवस्थापक प्रमोद म्हात्रे, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. या मदतीमुळे खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी स्पर्धेसाठी त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, २ ते ६ एप्रिलदरम्यान सिन्नर (जि. नाशिक) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचे पुरुष व महिला कबड्डी संघ १ एप्रिल रोजी रवाना होणार आहेत.

## उलवे नोड सी-फूड फेस्टिव्हलमध्ये बहारदार कार्यक्रम





### नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष पुरस्कृत आणि श्री गणेश सामाजिक मंडळ, गव्हाण यांच्या वतीने आयोजित उलवे नोड सी-फूड फेस्टिव्हलला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दुसऱ्या दिवशी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

यावेळी प्रसिद्ध गायक परमेश माळी यांनी महोत्सवाला उपस्थिती लावत आपल्या सादरीकरणातून वातावरण रंगवले. विशेषतः त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर सादर केलेल्या गाण्यामुळे कार्यक्रमाला अधिकच उंची लाभली.

यानंतर हास्य प्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांच्या याल तर हसाल या विनोदी कार्यक्रमाने उपस्थितांना खळखळून हसवले तसेच स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या नृत्य कार्यक्रमांनीही प्रेक्षकांची मने जिंकली.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, कामगार नेते मोतीलाल कोळी, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. एकंदर सांस्कृतिक कार्यक्रम, विनोद आणि संगीत यांचा संगम साधत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाने रंगत आणली.

# रायगडातील हापूस आंबा संकटात


## बदलत्या हवामानामुळे पिकाचे नुकसान

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणाला लाभलेले निसर्गाचे वरदान म्हणून ओळखला जाणारा 'फळांचा राजा' हापूस आंबा यंदा अभूतपूर्व संकटात सापडला आहे. देश-विदेशात मोठी मागणी असलेल्या या आंब्याच्या हंगामाकडे दरवर्षी उत्सुकतेने पाहिले जाते, मात्र यंदा बदलत्या हवामानामुळे आंबा व काजू या दोन्ही नगदी पिकांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे.

उत्पादनात तब्बल ९० टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे चित्र असून, उर्वरित पिकावरही रोग व अवकाळी पावसाचे सावट कायम उभे ठाकले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील बागायतदार शेतकरी पुरता संकटात सापडला आहे.

हापूसच्या पहिल्या पेटीसाठी मुंबईपुणे बाजारपेठेत श्रीमंत ग्राहकांची लिलावात चढाओढ असते, परंतु यंदा "पहिला आंबा कोण खाणार?" हा प्रश्नच अनुत्तरित राहण्याची वेळ आली आहे. हवामानाचा घातक खेळ निसर्गाने मांडला असून याबद्दल त्या हवामानाने मोहरावरच घाव घालून बागायतदारांचे प्रचंड नुकसान केले आहे. यंदाच्या हंगामात हवामानाने अक्षरशः लपंडाव खेळला आहे. पाऊस उशिरा थांबला तसेच थंडी उशिरा सुरू झाली मध्येच तापमानात अचानक वाढ या



चढउतारा मुळे डिसेंबरमध्ये यायला हवा असलेला आंब्याचा मोहोर उशिरा आला. जानेवारीत थंडीचा परिणाम दिसला, मात्र त्यानंतर अचानक तापमान वाढल्याने मोहर गळून पडला. परिणामी उत्पादनावर मोठा परिणाम झाला.

रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, मुरूड, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, कोल्हापूर व अलिबाग येथे बहुतांश भागात सुरुवातीला मोहोर दिसत असला तरी प्रत्यक्षात फळ धारणा अत्यल्प राहिली. सध्या अनेक ठिकाणी केवळ पाच टक्केच आंबा शिल्लक आहे. त्यातच अवकाळीचा फटका बसत आहे.

या फळावर रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे त्यावर औषध फवारणीवर खर्च वाढला आणि उत्पादन शून्य अशी स्थिती झाली. हवामानातील बदलामुळे तुडतुडे व भुरीसारख्या रोगांचा प्रादुर्भाव वाढला. शेतकऱ्यांनी फवारणीसाठी मोठा खर्च केला एका फवारणीसाठी तब्बल ४५ हजार रुपये माणगाव तालुक्यातील मोर्बा येथील बागायतदार शेतकरी अबूबकर गंगरेकर यांना आला खर्च आला. त्यांनी आपल्या आंबा फळ पिकावर तीन ते चार वेळा औषध फवारणी केली. तरीही उत्पादनावर काहीच परिणाम झाला नाही. "फवारणी केली, एवढंच समाधान; पण हातात काहीच आलं नाही," अशी शेतकऱ्यांची हतबल प्रतिक्रिया आहे.

**यंदा नैसर्गिक आपत्तीमुळे संपूर्ण कोकणासह रायगड जिल्ह्यातील आंबा फळपीक उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे. याची शासनाला पूर्ण जाणीव आहे. नुकसानग्रस्त बागायतदारांचे सर्वेक्षण तातडीने पूर्ण करण्याच्या प्रशासनाला सूचना दिल्या असून नुकसानीचा अहवाल आल्यानंतर त्या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून योग्य ती नुकसानभरपाई निश्चित केली जाईल. शासन या विषयात अत्यंत सकारात्मक असून आंबा उत्पादकांना निश्चितपणे न्याय मिळेल.**
**-भरत गोगावले,** फलोत्पादनमंत्री

**रायगड जिल्ह्यात ९० टक्के आंबा पिकाचे नुकसान झाले आहे. याबाबत जिल्ह्यात विद्यापीठाच्या तज्ञ शास्त्रज्ञा कडून नुकसानीचा सर्वे करण्यात आला. त्याचा अहवाल शासनाकडे पाठविला असून. शासनाकडून नुकसान भरपाई देण्याचे आदेश येतील त्याप्रमाणे पुढील कारवाई केली जाईल.**
**-वंदना शिंदे,** जिल्हा कृषी अधिकारी, रायगड

# पुनर्वसित गावांतील शाळा उभारणीचा प्रश्न मार्गी लावा

## २७ गाव प्रकल्पग्रस्तांकडून जि.प. अध्यक्ष वाकडीकर यांना निवेदन

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसित गावांमध्ये शाळा उभारणीचा प्रश्न गंभीर बनला असून, याबाबत २७ गाव प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या वतीने रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांना निवेदन देण्यात आले. या वेळी पंचायत समिती उपसभापती भुपेंद्र पाटील उपस्थित होते.



यावेळी संस्थेच्या वतीने अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील, कार्याध्यक्ष रूपेश धुमाळ, रवींद्र पाटील, मनखुश नाईक, अनिल केणी, रोशन घरत, अमित मढवी व इतर सदस्य उपस्थित होते चिंचपाडा, कोपर, कोल्ही, वाघिवली वाडा, वरचे ओवळे, उलवे, कोंबडभुजे, तरघर, गणेशपुरी आदी गावांतील शाळा संपादित होऊन दहा वर्षांचा कालावधी लोटला असतानाही पुनर्वसन क्षेत्रात नवीन शाळांची उभारणी झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला असून, संविधानाने दिलेल्या शिक्षणाच्या मूलभूत हक्कावर गदा येत असल्याचे संस्थेने निवेदनात नमूद केले आहे.

पुनर्वसित क्षेत्रातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता प्रत्येक गावात इयत्ता १ ते ८ पर्यंत शिक्षणाची सोय असलेली सुसज्ज शाळा उभारणे आवश्यक आहे, मात्र सिडकोकडून केवळ ४ वर्गखोल्यांचे नियोजन करण्यात आले असून ते अपुरे असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रत्येक शाळेत किमान १८ खोल्या, स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष, ग्रंथालय, संगणक कक्ष, तसेच मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच चिंचपाडा (आर-२) व तरघर येथील सिडकोकडून उभारलेल्या शाळा संबंधित गावांना देण्यात याव्यात व भविष्यात इयत्ता ९ ते १२ पर्यंत शिक्षणाची सुविधा सुरू करण्यासाठी नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी सदर प्रश्न गांभीर्याने घेऊन संबंधित यंत्रणेशी चर्चा करून योग्य तो तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

# नेरळमध्ये दीड लाखांचे दागिने हिसकावले

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ शहरात एका महिलेच्या गळ्यातील दीड लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

रविवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास, मौजे नेरळ गाव हद्दीत अंबिका नाका ते एचडीएफसी बँक परिसराच्या रस्त्यावर घडली. फिर्यादी महिला वैशाली पवार या हेटकर आळी येथून अंबिका नाका येथे पायी चालत जात असताना, पाठीमागून मोटरसायकलवरून आलेल्या अज्ञात आरोपीने त्यांच्या गळ्यातील दागिन्यांवर डल्ला मारला.

आरोपी काळे कपडे व काळे हेल्मेट घालून आला होता. आरोपीने स्वतःची ओळख लपविण्याच्या उद्देशानेच हा प्रकार केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या चोरट्याने ५० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन तसेच एक लाख रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र असे एकूण एक लाख ५० हजार रुपये किमतीचे दागिने हिसकावून घटनास्थळावरून पळ काढला.

फिर्यादी महिला काही समजून घेण्याच्या आतच आरोपी मोटरसायकलसह पसार झाला. या प्रकारामुळे नेरळ परिसरात विशेषतः महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३चे कलम ३०४(२) प्रमाणे अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक काजरोळकर करीत आहेत.

या घटनेनंतर नागरिकांकडून रात्रीची गस्त वाढविणे, संशयित वाहनस्वारांवर लक्ष ठेवणे आणि सीसीटीव्हीच्या आधारे आरोपींचा तातडीने शोध घेणे, अशी मागणी करण्यात येत आहे.

# हत्तीरोग निर्मूलनाच्या मोहिमेला वेग : मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र



नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.

ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दरः नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर (एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टयावरून २०२४ पर्यंत एक टयापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय हत्तीरोग निर्मूलन शक्य नसल्याचेही तज्ञांनी स्पष्ट केले आहे.

# वाशीत 'उमेद'मध्ये सहा दिवसांत सहा कोटींची विक्रमी उलाढाल

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यस्तरीय 'महालक्ष्मी सरस' प्रदर्शनात गेल्या सहा दिवसांत या प्रदर्शनाने यशाचे मापदंड मोडीत काढत तब्बल सहा कोटी रुपयांहून अधिकची विक्रमी उलाढाल केली आहे. ४२० स्टॉल्सवर सध्या नवी मुंबईकरांची तुफान गर्दी उसळली असून आर्थिक गणितांच्या बाबतीत यंदा 'महालक्ष्मी' खऱ्या अर्थाने सरस ठरल्या आहेत.

प्रदर्शनात पाऊल ठेवताच महाराष्ट्राच्या विविध संस्कृतीचे आणि चवींचे दर्शन घडते. वाडी (नांदेड) येथील मंजुषा देशमुख यांची प्रेरणादायी कथा काळजाला भिडते. सॉफ्टवेअर इंजिनिअरची नोकरी सोडून आणि कर्करोगासारख्या व्याधीवर मात करून त्यांनी १० एकर शेतात शेवग्याची लागवड केली. आज त्यांच्या 'मोरिंगा' उत्पादनांनी बाजारपेठेत क्रांती घडवली आहे. त्यांच्या सोबतीला अमरावतीच्या मुक्ती गटाने शेवगा सूप आणि ग्रीन टीच्या माध्यमातून आरोग्याचा



नवा मंत्र दिला आहे.

हस्तकलेचा अद्भुत नमुना पाहायचा असेल, तर कोल्हापूरच्या कांचन आणि योगिता पाटील यांच्या स्टॉलवरची 'आजीची गोधडी' आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. तांब्याला सोनेरी लूक देणाऱ्या अलिबागच्या वैष्णवी वैद्य यांचे हँडमेड दागिने आणि कोल्हापूरच्या ऋता पेंढारकर यांचा अस्सल 'कोल्हापुरी साज' महिलांच्या पसंतीस उतरला आहे.

दिवसभर खरेदी करून थकलेले नवी मुंबईकर रात्री इथे सहकुटुंब विसावतात आणि सुरू होते अस्सल खाद्यजत्रा. दही धपाटे, जळगावचे भरीत-भाकरी आणि लातूर-धाराशिवच्या पिठलं-भाकरीची लज्जत न्यारीच आहे. कोल्हापूरचा तांबडा-पांढरा रस्सा आणि सावजी बेतावर खवय्यांच्या उड्या पडत आहेत. सायंकाळी ६ नंतर या परिसराला जत्रेचे स्वरूप येते.

# कर्जतमध्ये महावीर जयंती उत्साहात साजरी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरांतील जैन बांधवांनी महावीर जयंती उत्साहात साजरी केली. या निमित्ताने महावीरांच्या प्रतिमेची मिरवणूक शहरातून काढण्यात आली. यावेळी जैन बांधवांनी 'जिओ और जिने दो' च्या घोषणांनी कर्जत शहर दणाणून सोडले होते. जैन बांधव व भगिनींनी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते.



तपगच्छाधिपतींचे (तपगच्छ संप्रदायाचे प्रमुख) शिष्यरत्न, महाराष्ट्र भूमीचे तारणहार परमपूज्य आचार्य श्री विजय रामचंद्रसूरीश्वरजी महाराज यांचे शिष्य, परमपूज्य आचार्य श्री विजय कीर्तियश सूरीश्वरजी महाराज यांच्या शुभ आशीर्वादाने मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. या मिरवणुकीत चौदा स्वप्नांच्या प्रतिकृतींचे आयोजन करण्यात आले होते. जैन मंदिरापासून निघालेली मिरवणूक बाजारपेठेतून लोकमान्य टिळक चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या वरून छत्री केंद्र मार्गे पुन्हा जैन मंदिराकडे आली.

जैन बांधवानी व खास करून लहान मुलांनी नाचून मिरवणुकीची शोभा वाढवली. या मिरवणुकीत घोडे सुद्धा सहभागी करण्यात आले होते. यावेळी चोख पोलीस बंदोबस्त होता. नगरसेवक प्रशांत पाटील, नगरसेवक रोहित ओसवाल, जैन समाजाचे अध्यक्ष अजित ओसवाल, मोहन ओसवाल, उमेदमल ओसवाल, अशोक ओसवाल, रणजित जैन, दिनेश जैन, सचिन ओसवाल, पप्पू परमार, पंकज परमार, अक्षय ओसवाल, रमेश ओसवाल, प्रकाश ओसवाल, किरण जैन, दिनेश सोलंकी, मनोज ओसवाल, भरत सोलंकी, अरविंद जैन, भावना ओसवाल, संतोष ओसवाल, टीना ओसवाल, लता ओसवाल, नीता कंकारिया, सुनीता ओसवाल, सुरेखा ओसवाल, संगीता ओसवाल, सीमा ओसवाल आदी जैन समाजाचे बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डीएमसीसी कंपनीत योग प्रशिक्षण शिबिर

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील डीएमसीसी या केमिकल कंपनीत कामगार व स्टाफ यांच्या आरोग्यवृद्धीसाठी विशेष मेडिटेशन, योगसाधना व फिटनेस प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यास कामगारांचा प्रतिसाद लाभला.



यावेळी अनुभवी योग प्रशिक्षक विभा चोरगे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी उपस्थित कामगारांना दैनंदिन जीवनात योगसाधनेचे महत्त्व, मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी ध्यानधारणा (मेडिटेशन), तसेच शारीरिक तंदुरुस्ती टिकवण्यासाठी आवश्यक योगासनांची सविस्तर माहिती दिली. विविध प्रकारच्या सोप्या व प्रभावी योगासनांचे प्रात्यक्षिकही त्यांनी करून दाखविली.

कंपनीचे युनिट हेड किरण हिंगणे व एचआर मॅनेजर अनिल जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला. कामगारांच्या आरोग्याची काळजी घेणे ही कंपनीची सामाजिक जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या महिलेचा विनयभंग

**खोपोली :** पतीला होणारी मारहाण सोडविण्यासाठी मध्ये पडलेल्या महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी रमाकांत विठ्ठल पाटील (वय ५०,रा.गोरठण, वावोशी खालापूर)विरुद्ध पिडित महिलेनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पीडित महिलेच्या पतीला रमाकांत मारहाण करत होता. यादरम्यान पीडित महिलामध्ये पडली असता तिच्या कमरेला चुकीचा स्पर्श करून तिला रमाकांत याने ढकलून दिल्याने तिची ब्लाऊज व साडी फाटली. घडलेल्या प्रकारामुळे लज्जा उत्पन्न होऊन विनयभंग झाल्याची भावना पिडितेच्या मनात निर्माण झाली. या घटनेबाबत घरातल्या मंडळीची चर्चा करून ३० मार्च रोजी पिडीतेने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# माथेरान पालिकेत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निरोप



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान गिरीस्थान नगरपालिका कर्मचारी प्रविण सुर्वे यांनी त्यांच्या सेवेचा कार्यकाळ पूर्ण केला ३० मार्च रोजी ते सेवानिवृत्त झाले. तसेच यावेळी श्रेणी ४ कर्मचारी अनिता चव्हाण यादेखील सेवानिवृत्त झाल्या. दोन्ही नगरपालिका कर्मचारी यांना त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मिळून त्यांना सन्मानपूर्वक निरोप देऊन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

माथेरान गिरीस्थान नगरपालिकेत प्रदीर्घ काळ सेवा बजावून वयोमर्यादेनुसार सेवानिवृत्त झालेले लेखनिक प्रवीण सुर्वे आणि श्रेणी चार कर्मचारी अनिता चव्हाण यांचा नगरपालिकेतर्फे नागरिकांच्या साक्षीने भावपूर्ण व सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. यावेळी माथेरान अधीक्षक सुरेंद्रसिंह ठाकूर, नगरपालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, उपनगराध्यक्ष संतोष शेलार तसेच सर्व नगरपालिका कर्मचारी वृंद उपस्थित होता.

कार्यक्रमादरम्यान नगरसेवक शिवाजी शिंदे, सचिन दाभेकर, मनोज खेडकर, माजी नगरसेवक कुलदीप जाधव यांनी प्रवीण सुर्वे यांच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत मनोगते व्यक्त केली.

## दुखवटा

### सावित्री मोरे



**खालापूर :** खालापूर तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार हनुमंत मोरे यांच्या आई सावित्री दत्तारामराव मोरे (वय ८६) यांचे रविवारी निधन झाले. यांच्या पश्चात पाच मुलगे, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. सावित्री बाई यांनी अत्यंत गरिबीतून आपल्या मुलांना शिक्षण दिले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच तालुक्यातील सर्वच स्तरातील मान्यवरांनी त्यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी परखंदे (शिंदीवाडी) येथील त्यांच्या निवासस्थानी धाव घेतल्याचे पहायला मिळाले.

## निवडक

### दोन ठिकाणी घरफोडी

**पनवेल :** दोन बंद घरांमध्ये घरफोडी करत चोरांनी चांदीच्या, पितळेच्या वस्तू आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात २८ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अर्जुन मोहिते (रा. सेक्टर १५ ए, नवीन पनवेल) यांच्या रूमच्या दरवाजाचे लॉक तोडून चोराने चांदीच्या समई, घंटी, पैंजण, जोडवी, कंगन, सोन्याचे बदाम, रोख रक्कम आणि देवाच्या पितळेच्या मूर्ती चोरून नेल्या तर त्यांच्याच सोसायटीमधील पहिल्या माळ्यावरील रूम नंबर तीन मधील अक्षया व्यंकटेश्वरा यांच्या घरातून देखील चांदीचे दिवे, समई, वाट्या, ग्लास आणि रोख रक्कम व देवीच्या मूर्ती चोरून नेल्या.

### वीजचोरीप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** वीज मीटर मध्ये छेडछाड करून तीन लाख दोन हजारांची विज चोरी करून महावितरणचे नुकसान केल्याप्रकरणी रतन घरत आणि मनोहर शेळके यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. ११ फेब्रुवारी रोजी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कोनगाव येथे वीज मीटर तपासणीसाठी गेले. यावेळी रतन घरत आणि मनोहर शेळके यांच्या वीज मीटरची पाहणी केली. त्यावेळी मीटर मंद गतीने चालत असल्याचे दिसून आले. वीज मीटर मध्ये फेरफार केल्याचे समोर आले. बारा महिन्यांपासून ८ हजार २९८ युनिटची वीज चोरून वापरली. आणि महावितरण कंपनीचे नुकसान केले. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

### हनुमान जयंती उत्सव

**पनवेल :** आंबे-शिवणसई आणि आंबेवाडी येथे हनुमान जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन २ एप्रिल रोजी करण्यात आले आहे. यावेळी श्रींची पूजा आणि अभिषेक, जन्मोत्सव सोहळा, भजन, महाप्रसाद, कीर्तन, पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी नरेश कुमार अग्रवाल, अतुल अग्निहोत्री अभिनेते, माजी खासदार रामशेठ ठाकूर, बाळासाहेब पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, महापौर नितीन पाटील, माजी नगरसेवक प्रीतम म्हात्रे यांच्यासह अनेक जण उपस्थित राहणार आहेत.

### दुकानातून मोबाईलची चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील संत सावतामाळी हॉलच्या मागे एका महिलेचा मोबाईल अज्ञात चोरट्याने त्यांच्या दुकानातून चोरून नेल्याची घटना घडली आहे. नियाज अहमद पटेल (वय ६८) यांच्या दुकानातून ५ हजार रुपये किमतीचा ओपो कंपनीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने त्यांच्या दुकानातून चोरून नेल्याने तसेच फोनचा गैरवापर करून त्यांच्या खात्यातील पैसे काढल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वातावरणामध्ये बदल

**पनवेल :** गेले काही दिवस हवामानामध्ये बदल सुरू आहे. महाराष्ट्रात काही ठिकाणा पाऊस पडत आहे. त्यामुळे पनवेलसह आजुबाजूच्या परिसरात सकाळ ते दुपार कडक ऊन असते आणि सायंकाळ ढगाळ वातावरणामुळे हवा सुटते तर रात्री प्रचंड उकाडा जाणवतो. अशा बदलत्या वातावरणाचा नागरिकांच्या जीवनावर परिणाम होत असतो. वातावरणातील हा बदल अनेक आजारांना आमंत्रण देत असून डॉक्टरांनी नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

# पनवेल महापालिकेची ६९१ कोटींची करवसुली

## मालमत्ता कर विभागाची ऐतिहासिक कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ६९१कोटी कोटींची वसुली केली असून हा आजवरील सर्वाधिक वसुलीचा विक्रम आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागाने गेले वर्षभर नियोजनबध्द पध्दतीने रूपरेषा आखून वसूलीचा हा विक्रम केला आहे. मालमत्ताकर विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नियंत्रणाखाली योग्य उपाययोजना राबवत एकुण ६९१ लाख इतका महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.



मागील वर्षी सप्टेंबर महिन्यांपर्यंत ९०टक्के शास्ती मध्ये सूट त्यानंतर शास्ती मध्ये७५ टक्के सूट मालमत्ता करांमध्ये देण्यात आली होती. या सर्वांचे फलित म्हणजे या आर्थिक वर्षात आतापर्यंत चा सर्वाधिक म्हणजे एकुण ६९१ कोटी इतका महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. मालमत्ता विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे व कर अधिक्षक महेश गायकवाड व सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली चारही प्रभागामंध्ये गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यापर्यंत तसेच गेला मार्च महिना संपेपर्यंत कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी कोणतीही सुट्टी न घेता शनिवार, रविवारीदेखील कार्यालये सुरू ठेवली. पालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी मालमत्ता करधारकांडून पालिकेने वसुलीची थेट कारवाई सुरु केली. या वसुलीसाठी महापालिकेच्या वतीने यावेळी १३ पथके तयार केली होती. प्रभाग अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही पथके सर्व प्रभागांमध्ये वसुलीसाठी जात होती.

या आर्थिक वर्षात एकूण १७५३ थकबाकीदारांना जप्ती नोटीसा देण्यात आल्या तर या अटकावणी मोहिमेत १७० मालमत्तांवर अटकावणीची कारवाई करण्यात आली.

### ...तर बिलात सुधारणा करून देणार

महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून वेळोवेळी मालमत्ताधारकांच्या आक्षेप व हरकतीनुसार त्यांच्या बिलात सुधारणा करून दिली जात आहे. याचबरोबर यापुढेही मालमत्ताधारकांना त्यांच्या बिलाबाबत कोणत्याही हरकती किंवा सूचना असल्यास त्यानुसार त्यांच्या बिलात सुधारणा करण्याची भूमिका महापालिकेने घेतली आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या सूचना किंवा आक्षेप असल्यास तो नोंदवावा आणि आपला मालमत्ता कर भरून पनवेलच्या विकासास हातभार लावावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

# खारघरच्या मंदिरात चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर उपनगरातील सेक्टर ५ मधील अंबामाता मंदिरात रविवारी मध्यरात्री चोरीची घटना घडली असून, अज्ञात चोरट्याने दानपेटीतील रोख रक्कम व चांदीचे दागिने असा सुमारे ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमुळे अनेक कुटुंबे घराबाहेर जात असल्याचा फायदा घेत चोरटे सक्रिय झाल्याचे चित्र पनवेल परिसरात दिसत आहे. अशाच प्रकारे खारघरमधील अंबामाता मंदिरावर चोरट्याने डोळा ठेवत रविवारी मध्यरात्री दोन ते तीन वाजण्याच्या सुमारास मंदिरात प्रवेश केला. मंदिर प्रशासनाने खारघर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, संशयित चोरटा ट्रॅकशर्ट व पॅन्ट घालून मंदिराच्या कुंपणावरून आत शिरला. त्याने प्रथम मंदिरातील पुजाऱ्यांच्या राहत्या खोलीचे दार बाहेरून कपड्याने बांधून त्यांना अडवले. त्यानंतर गाभाऱ्याच्या खिडकीचे लोखंडी गज वाकवून आत प्रवेश करत चोरी केली.

चोरट्याने दानपेटीतील रोख रक्कम तसेच देवीचे चांदीचे दागिने (हार, कानातील झुमके आणि मांगटिका) असा सुमारे ४० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. एकूण चोरीचा मुद्देमाल सुमारे ४४ हजार रुपयांचा असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पोलिसांनी गस्त वाढवण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

# खांदेश्वर पोलिसांमार्फत दंगा काबू योजना

**पनवेल : वार्ताहर**

खांदेश्वर पोलिसांच्या मार्फत हद्दीमध्ये शिवशंकर मंदिर खांदा कॉलनी या ठिकाणी पालखी मिरवणुकीवरून दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याच्या घटनेच्या अनुषंगाने दंगा काबू योजना राबविण्यात आली.

वपोनि स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे कडील ०५ अधिकारी व ३० पोलीस अंमलदार लाठी काठी ,ढाल हत्यारासह, फायर ब्रिगेडचे एक अधिकारी पाच फायरमन, ॲम्बुलन्स स्टाफ सह एकत्रितपणे हद्दीमध्ये शिवशंकर मंदिर खांदा कॉलनी या ठिकाणी पालखी मिरवणुकीवरून दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याच्या घटनेच्या अनुषंगाने दंगा काबू योजना राबविण्यात आली.





# रखवालदाराकडूनच लूट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील पुष्पकनोड परिसरात घडलेल्या धक्कादायक घरफोडी प्रकरणात इमारतीच्या रखवालदाराचाच सहभाग असल्याचे उघड झाले. सेक्टर आर-४ मधील सिद्धिविनायक व्हिला येथे सुमारे ४० लाखांच्या ऐवजाची चोरी झाली होती.

या इमारतीत राहणारे कुटुंब घराबाहेर गेले होते. याच संधीचा फायदा घेत इमारतीच्या रखवालदाराने घरफोडीचा डाव साधल्याचे समोर आले. यावेळी चोरी झाल्याचे कळताच पोलिसांना बोलावण्यात आले. पोलिसांनी संपुर्ण इमारतीची तपासणी केल्यावर चोरांनी टेरेसवरून रस्सीच्या सहाय्याने घरात प्रवेश केला आणि त्यानंतर घरातील लाकडी कपाट फोडून तसेच बेडमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेण्यात आल्याचे समोर आले.

# वाहनाच्या धडकेत पादचारी जखमी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केवाळे बसस्टॉपजवळ काळया पिवळ्या रंगाच्या इको टॅक्सीने पादचाऱ्याला धडक दिली. या धडकेत मोहन मुरमुर हा जखमी झाला. या प्रकरणी चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २८ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

२७ मार्च रोजी मोहन मुरमुर हा पायी चालत जात असताना हरीग्राम ते केवाळे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील केवाळे बस स्टॉपजवळ काळया पिवळ्या रंगाच्या इको टॅक्सीने संध्याकाळी साडेसातच्या सुमारास त्याला ठोकर मारून अपघात केला.

या अपघातात मोहन याच्या पाठीवर आणि डोक्याला गंभीर दुखापती झाल्या. त्याला सुकापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त विंग्स ऑफ हॅप्पीनेस कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरण तालुक्यातील द्रोणागिरी भागातील श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात वींग्स ऑफ हॅप्पीनेस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांनी शिक्षण प्रसाराचा वारसा अविरत तेवत ठेवून अगदी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचवण्याचे कार्य केले. आज अतिशय दुर्गम भागात देखील उच्च दर्जाचे शिक्षण विद्यार्थी घेत आहेत.साहेबांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात उरण मधील स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठानचे SEA BIRD Special school यांच्या समवेत Wings of Happiness या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात उपस्थित श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयातील विद्यार्थ्यांनीदेखील सहभाग नोंदवत नृत्य तसेच गायन सादर केले. तसेच SEA BIRD विद्यालयच्या विद्यार्थ्यांनी देखील आपल्या कलागुणांना वाव देत वेगवेगळी नृत्य सादर केली. तसेच श्रेया चंदन भगत समवेत विद्यार्थिनींनी सुंदर असे स्वागत गीत सादर करत विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

या दिनाचे औचित्य साधत उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ चे वाटप तसेच शाळेच्या बॅग तसेच शैक्षणिक साहित्य भेटवस्तू म्हणून दिल्या. यावेळी विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, सुरेश पाटील (कमिटी मेंबर), सुनिल पाटील (कमिटी मेंबर) डी.पी.सोनवणे SEA BIRD विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पल्लवी परदेशीं व पर्यवेक्षिका स्मिता मॅडम आदी उपस्थित होते.

यावेळी विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत यांनी SEA BIRD विद्यालयाला मदत करण्याचे आश्वासन देत आम्ही कायम तुम्हाला सहकार्य करू असे सांगितले. मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मान्यवरांचे आभार व्यक्त केले. शिका आणि स्ववलंबी बना हे ब्रीदवाक्य मनाशी तेवत ठेवून पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. SEA BIRD विद्यालयाच्या मुख्याधपिका पल्लवी परदेशी यांनी श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व शिक्षकांचे आभार मानले.

# वावेघर उपकेंद्र येथे एचपीव्ही लसीकरण जनजागृती कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या एचपीव्ही लसीकरण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी वावेघर उपकेंद्र येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. १४ ते १५ वयोगटातील मुलींना गर्भाशयाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी ही मोहीम राबवली जात आहे.

या कार्यक्रमास पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, वावेघर जिल्हा परिषद सदस्या अनन्या गाताडे, पंचायत समिती सदस्य राजू पाटील, तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडकर, वावेघर सरपंच गीतांजली गाताडे, तुराडे सरपंच रंजना गायकवाड, ग्रामपंचायतीचे सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडकर आणि जिल्हा परिषद सदस्या अनन्या गाताडे यांनी आशा सेविका, आरोग्य मदतनीस, ग्रामस्थ व लाभार्थी मुलींना एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व पटवून दिले. लसीकरणाबाबत असलेले गैरसमज दूर करून अधिकाधिक मुलींनी या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

सभापती रंजना वास्कर यांनी लसीकरण मोहिम यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करत उपस्थितांचे आभार मानले. वावेघर उपकेंद्रात झालेल्या या जनजागृती कार्यक्रमामुळे लसीकरण मोहिमेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



# वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली जेएनपीटी हायवेवर करंजाडे एक्झिट पॉइंटवर एका मोटरसायकलीस अज्ञात वाहनाची ठोकर बसून झालेल्या अपघातात मोटरसायकलस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

विनय सोनवणे (वय ३०, रा. खारघर) हा त्याच्या ताब्यातील होंडा एक्सपल २०० (एमएच ०३ डीआर ७१९०) हीने जात असतांना पनवेल शहराजवळील कळंबोली जेएनपीटी हायवेवर करंजाडे एक्झिट पॉइंटवर यातील अज्ञात आरोपीताने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, बेदरकारपणे, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवुन विनय सोनवणे यांच्या दुचाकीला ठोकर मारून त्याचा अपघात करून त्यास साधी व गंभीर दुखापत करून त्यास कोणतीही वैद्यकिय मदत न करता, पोलिसांना अपघाताची खबर न देता तेथुन निघुन गेला. यात विनय सोनवणे यांचा मृत्यू झाला असून या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# गव्हाण-कोपर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ; शांतादेवी मंदिरात कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ प्रस्तुत तसेच माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ श्री शांतादेवी मंदिरात भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी पारंपरिक पद्धतीने देवीचा अभिषेक करण्यात आला.

यावेळी अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ मंगळवारी अरुण घरत आणि त्यांच्या सौभाग्यवती तसेच पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे शांतादेवीच्या यात्रेनिमित्त या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन यात्रेच्या आठ दिवस आधी करण्यात येते. गेल्या २१ वर्षांपासून हा धार्मिक उपक्रम सातत्याने सुरू असून, परिसरातील भाविकांचा मोठा सहभाग लाभत आहे. दरम्यान, कामगार नेते महेंद्र घरत, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य किरण देशमुख, भाजपचे नेते कमलाकर देशमुख, के.डी. कोळी, वसंतशेठ पाटील, किशोर पाटील यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

या सप्ताहादरम्यान दररोज भजन, कीर्तन, पारायण यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला आहे. आयोजकांनी सर्व भाविकांनी या सप्ताहात सहभागी होऊन धार्मिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.





## संपादकीय

# विकासाचा मार्ग मोकळा

देश ३१ मार्च २०२६ पर्यंत माओवादमुक्त होईल अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी वर्षभरापूर्वी केली होती. ही मुदत मंगळवारी संपत असताना अमित शहा यांनी माओवाद्यांची सर्वोच्च संघटना आणि केंद्रीय रचना जवळपास पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याची घोषणा सोमवारी लोकसभेत केली. माओवादमुक्त भारत हे मोदी सरकारचे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल.

**देशातील १२ राज्ये नक्षलवादाने प्रभावित होती. डाव्या विचारसरणीमुळे या राज्यांमध्ये नक्षलवाद पसरला होता. नक्षलवादाने तेथील विकास रोखून धरला. त्यांनी शाळा जाळल्याने आदिवासी मुलांना शिक्षण मिळू शकले नाही. परंतु आता महाराष्ट्रातील गडचिरोलीसारख्या माओवादग्रस्त भागात विकासाचे नवे चित्र उभे राहात असून लोकशाहीची मुळे बळकट होत आहेत. देश ३१ मार्च २०२६ पर्यंत माओवादमुक्त करण्याची मुदत मंगळवारी संपत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी माओवाद्यांची सर्वोच्च संघटना आणि केंद्रीय रचना जवळपास पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याची घोषणा सोमवारी लोकसभेत केली तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीत पोलिसांनी निर्णायक यश मिळवले आहे असे सांगितले. महाराष्ट्रासह १२ राज्यांना 'रेड कॉरिडॉर' म्हणून घोषित करण्यात आले होते. आता तेथील माओवाद्यांचे राज्य संपुष्टात आले आहे. गेल्या वर्षभरात नक्षलवाद्यांचे अनेक म्होरके मारले गेले आणि बाकीचे बरेच जण शरण आले. गेली अनेक दशके माओवादी हिंसाचारामुळे या भागांतील तब्बल १२ कोटी लोक गरिबीत जगत होते. या हिंसाचारात दोन्ही बाजूंचे २० हजार तरुण मारले गेले आणि कित्येक अपंग झाले. यासाठी जबाबदार कोण हा प्रश्न खरेच विचारला जायला हवा. स्वातंत्र्यानंतरच्या ७८ वर्षांपैकी ६० वर्षे काँग्रेस पक्ष सत्तेत होता. मग इतकी वर्षे भाबड्या आदिवासींपर्यंत सुविधा न पोहोचण्यास आणखी कुणाला जबाबदार धरायचे? आपल्या सत्ताकाळात आपण नक्षलवादाच्या समस्येसंदर्भात काय केले ते काँग्रेसने स्पष्ट करावे. माओवादमुक्त भारत हे मोदी सरकारचे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल. सुरक्षा दलांच्या शौर्यामुळे माओवादाविरोधातील लढ्यात महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, केरळ, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, ओडिशा आणि तेलंगण या माओवादग्रस्त राज्यांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर आल्यावर देशातील गरिबांना घर, गॅस, पिण्याचे स्वच्छ पाणी आदी मूलभूत सुविधा मिळाल्या. दुर्गम भागांतील लोकांवर दीर्घकाळ अन्याय झाला हे खरेच आहे. पण या अन्यायावर शस्त्र उचलणे हा उपाय असू शकत नाही. नक्षलवाद आणि विकास एकत्र अस्तित्वात असू शकत नाहीत. मोदी सरकारच्या काळातच खऱ्या अर्थाने विकास सर्वदूर पसरला. आज बस्तरसारख्या भागात माओवाद जवळपास संपुष्टात आला आहे. येथील प्रत्येक गावात आता शिधावाटप दुकान व शाळा उघडण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. सरकार नक्षलवाद्यांच्या मुद्याबाबत संवेदनशील आहे. सर्व तक्रारी ऐकून घेण्यास सरकार तत्पर असून त्या सोडवण्यासही कटिबद्ध आहे असेही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्ट केले आहे. मात्र आता जो कोणी शस्त्र हातात घेईल, त्याला तसेच उत्तर दिले जाईल असे ठणकावून सांगण्यासही ते विसरले नाहीत. विकासाची वाट रोखून आदिवासींना अंधारातच चाचपडत जगायला भाग पाडणारा नक्षली विचार तिथे पुन्हा रुजणार नाही याची दक्षता मात्र इथून पुढे कटाक्षाने घ्यावी लागेल.**

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाने १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम अंतर्गत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणत डिजिटल परिवर्तनाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे विभागाच्या कामकाजात पारदर्शकता, वेग आणि उत्तरदायित्व वाढले असून नागरिकांना थेट आणि जलद सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे या कालावधीत ९९ टक्के तक्रारींचे यशस्वी निराकरण करण्यात विभागाला यश आले असून हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे द्योतक मानले जात आहे.

राज्य शासनाच्या १५० दिवस ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात सार्वजनिक बांधकाम विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत १८६.७५ गुण मिळवित सर्वोत्तम मंत्रालयीन विभागात राज्यात प्रथम स्थान पटकाविले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तत्कालीन अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर आणि विद्यमान अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

विभागाच्या या व्यापक परिवर्तनाचा केंद्रबिंदू ठरलेला घटक म्हणजे विभागाचे अद्ययावत आणि नागरिकाभिमुख संकेतस्थळ. १९९५ साली सुरू झालेले संकेतस्थळ आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पूर्णपणे नव्याने विकसित करण्यात आले आहे. एस३डब्ल्यूएएस (सिक्युअर स्केलेबल अँड सुगम्य वेबसाईट अॅज अ सर्व्हिस) या प्रणालीवर आधारित हे संकेतस्थळ अधिक सुरक्षित, वापरण्यास सुलभ आणि सर्वसमावेशक आहे. संकेतस्थळावर डब्ल्यूसीएजी २.२ आयएएपी प्रमाणित सुलभता साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यामध्ये अक्षरांचा आकार बदलणे, उच्च कॉन्ट्रास्ट मोड, टेक्स्ट-टू-स्पीच सुविधा, आवाजावर आधारित शोध आणि बहुभाषिक भाषांतर यांसारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील नागरिकांनाही सहजपणे माहिती मिळू लागली आहे.

संकेतस्थळाच्या वापरात झालेली वाढ ही या बदलाची साक्ष देते. संकेतस्थळ सुरू झाल्यापासून लाखो नागरिकांनी वापर केला असून पहिल्या ३० दिवसांतच दहा लाखांहून अधिक सक्रिय वापरकर्ते नोंदवले गेले आहेत. सरासरी सहा मिनिटांपेक्षा जास्त कालावधी वापरकर्ते संकेतस्थळावर घालवत असल्याने माहितीची उपयुक्तता आणि सुलभता स्पष्ट होते तसेच 'बाउन्स रेट' कमी असल्याने वापरकर्ते दीर्घकाळ संकेतस्थळावर टिकून राहत असल्याचे दिसून येते.

आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण हा विभागाच्या कामकाजातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. लोकसेवा हक्क अधिनियमाअंतर्गत अधिसूचित केलेल्या आठही सेवा पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आल्या असून, नागरिकांना आता अर्ज, मंजुरी, प्रमाणपत्रे यासाठी कार्यालयात जाण्याची आवश्यकता उरलेली नाही. या प्रक्रियेमुळे सेवा वितरणाचा कालावधी लक्षणीयरित्या कमी झाला आहे. पूर्वी सरासरी ३२ दिवस लागणारी प्रक्रिया आता केवळ २० दिवसांत पूर्ण होत आहे. याचबरोबर सेवास्तर पालनातही मोठी सुधारणा झाली असून ते ९० टक्क्यांवरून १३८ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.

तक्रार निवारण प्रणालीत झालेली सुधारणा ही या मोहिमेची सर्वात मोठी यशोगाथा ठरते. दैनंदिन देखरेख, संरचित आढावे आणि वेळेवर तक्रारींचे निवारण यामुळे तक्रार निवारणाचे प्रमाण ८० टक्क्यांवरून ९९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. एस्कलेशनचे प्रमाण १२ टक्क्यांवरून केवळ ०.०९ टक्क्यांपर्यंत घटले आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. सार्वजनिक विभागाने १,२४८ तक्रारींचे विश्लेषण करून त्यातील सुमारे ३९.५ टक्के तक्रारी रस्त्यांच्या देखभाल आणि गुणवत्तेशी संबंधित असल्याचे ओळखले. या विश्लेषणाच्या आधारे आवश्यक उपाययोजना राबविण्यात आल्या असून विशेषतः पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

बांधकाम विभागाच्या अंतर्गत कामकाजातही डिजिटल प्रणालींचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला आहे. ई-ऑफिस प्रणालीमुळे सर्व अधिकारी डिजिटल पद्धतीने काम करत असून फाईल हालचालीचे रिअल-टाइम निरीक्षण शक्य झाले आहे. यामुळे निर्णय प्रक्रियेला गती मिळाली असून विलंबात लक्षणीय घट झाली आहे. गव्हर्नमेंट प्रोसेस रि-इंजीनियरिंग (जीपीआर) च्या माध्यमातून ६४३ प्रक्रियांचे विश्लेषण करून कार्यपद्धती अधिक सुलभ करण्यात आली आहे.

डॅशबोर्ड आणि डेटा अॅनालिटिक्स प्रणालीमुळे विभागाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. सर्व लोकसेवा हक्क अधिनियमातील सेवा एकाच डॅशबोर्डवर उपलब्ध करून देण्यात आल्या असून, त्याद्वारे सेवा वितरणाचे रिअल-टाइम ट्रॅकिंग आणि भविष्यातील अंदाज बांधणे शक्य झाले आहे. मुख्यमंत्री डॅशबोर्डशी एकत्रीकरण केल्यामुळे वरिष्ठ स्तरावरून देखरेख अधिक सक्षम झाली आहे. यामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढले आहे.

नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी व्हॉटसअप आणि चॅटबॉटचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. पीडब्ल्यूडी चॅटबॉटद्वारे नागरिकांना सेवा, अर्ज प्रक्रिया, तक्रार निवारण याबाबत मार्गदर्शन मिळते. तसेच, व्हॉटसअप ब्रॉडकास्टिंगद्वारे हजारो नागरिकांना सेवांबाबत माहिती देण्यात आली आहे. या माध्यमातून नागरिकांचा सहभाग वाढून प्रशासन अधिक लोकाभिमुख बनले आहे.

तंत्रज्ञानाच्या वापरात विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेचाही प्रभावी अवलंब केला आहे. 'पॉथ्होलगार्ड' या एआय-आधारित प्रणालीद्वारे रस्त्यांवरील खड्ड्यांची ओळख करून त्यांची तातडीने दुरुस्ती केली जाते. GPS तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खड्ड्यांचे अचूक स्थान नोंदवले जाते आणि दुरुस्ती झाल्यानंतर त्याची पडताळणीही केली जाते. यामुळे रस्त्यांची गुणवत्ता सुधारून अपघातांची शक्यता कमी झाली आहे.

याशिवाय, विभागाने जेनएआय प्लॅटफॉर्मचा वापर करून धोरणनिर्मिती आणि विश्लेषणातही नवोन्मेष केला आहे. ड्रोन धोरण, रस्ता आखणी आणि पायाभूत प्रकल्पांसाठी निधी उभारणी यासारख्या विषयांवर एआयच्या मदतीने अभ्यास करण्यात आला आहे. यामुळे निर्णय प्रक्रियेत अधिक अचूकता आणि वेग आला आहे.

जीआयएस आणि 'पीएम गती शक्ती' पोर्टलच्या माध्यमातून प्रकल्प नियोजन अधिक शास्त्रीय पद्धतीने केले जात आहे. नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्ग प्रकल्पात विविध स्तरांवरील माहितीचा वापर करून जंगल क्षेत्र, वन्यजीव मार्ग आणि खनिज क्षेत्र यांचे अचूक विश्लेषण करण्यात आले. परिणामी, सुमारे २७ हेक्टर जंगल वाचवण्यात यश आले आहे, जे पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले आहे.

वृक्षलागवड उपक्रमातही विभागाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. 'ट्री अॅप'च्या माध्यमातून आठ लाखांहून अधिक झाडांची नोंद आणि देखरेख करण्यात आली आहे. जीपीएस आणि छायाचित्रांच्या साहाय्याने झाडांची स्थिती तपासली जाते आणि त्याच्या वाढीवर लक्ष ठेवले जाते. यामुळे पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळाली आहे.

या सर्व उपक्रमांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ प्रशासनिक कार्यक्षमता वाढवली नाही, तर नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जाही उंचावला आहे. या डिजिटल परिवर्तनामुळे नागरिकांचा शासनावरचा विश्वास अधिक दृढ झाला असून, पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनाची पायाभरणी झाली आहे.

एकूणच, १५० दिवस ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्यातील इतर विभागांसाठी आदर्श निर्माण केला आहे. भविष्यातही अशाच प्रकारे तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**-नंदकुमार वाघमारे, वरिष्ठ सहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

*सार्वजनिक बांधकाम विभागाने गेल्या १५० दिवसांत राबविलेल्या ई-गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमांमुळे प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. नागरिकांना जलद, पारदर्शक आणि दर्जेदार सेवा देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असून, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे. तक्रार निवारणात ९९ टक्के यश, सेवा वितरणातील वेग आणि डिजिटल प्रणालींचा व्यापक वापर यामुळे नागरिकांचा शासनावर विश्वास अधिक दृढ झाला आहे. पुढील काळातही 'नागरिक प्रथम' या तत्त्वावर काम करत विभागाला अधिक सक्षम आणि लोकाभिमुख बनविण्याचा आमचा प्रयत्न राहील.*

**-शिवेंद्रसिंह राजे भोसले, मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन**

*या १५० दिवस ई गव्हर्नन्स उपक्रमात आम्ही केवळ तांत्रिक बदल केले नाहीत, तर कार्यपद्धतीतही मूलभूत सुधारणा केल्या आहेत. ई ऑफिस, आपले सरकार पोर्टल, एआय-आधारित प्रणाली आणि डेटा अॅनालिटिक्स यांचा समन्वय साधत सेवा वितरण अधिक कार्यक्षम करण्यात आले आहे. दैनंदिन देखरेख, संरचित आढावे आणि प्रक्रियेचे सुलभीकरण यामुळे निर्णय प्रक्रियेला गती मिळाली आहे. या उपक्रमांमुळे प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि परिणामकारक झाले असून नागरिकांना त्याचा थेट लाभ होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा अजित पवार तसेच सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स उपक्रमातून सार्वजनिक बांधकाम विभागाने डिजिटल परिवर्तन प्रभावीपणे राबवले आहे.*

**-मनिषा म्हैसकर, तत्कालीन अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग**



## बदलते तंत्रज्ञान

### या देशातही १४ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया बंदी!

आजच्या डिजिटल युगात लहान मुलांच्या हातात मोबाईल आणि सोशल मीडिया हे एक मोठे संकट बनले आहे. याच संकटाचा सामना करण्यासाठी युरोपातील ऑस्ट्रिया सरकारने कंबर कसली आहे. १४ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याची तयारी या सरकारने सुरू केली आहे. मुलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी हे धाडसी पाऊल उचलले जात आहे.



**का घेतली जातेय ही टोकाची भूमिका?**

ऑस्ट्रिया सरकारच्या मते, सध्याचे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स अशा 'अल्गोरिद्म'चा वापर करतात, ज्यामुळे मुलांना तासनतास स्क्रीनला खिळवून ठेवले जाते. यामुळे मुलांना सोशल मीडियाचे व्यसन लागते, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या अभ्यासावर आणि मानसिक आरोग्यावर होत आहे. तसेच, अनेकदा मुलांच्या समोर त्यांच्या वयाला न शोभणारे अश्लील किंवा हिंसक व्हिडिओ येतात, जे त्यांच्या विचारसरणीवर घातक परिणाम करतात.

**कधी लागू होणार नवा नियम?**

मिळालेल्या माहितीनुसार ऑस्ट्रियामधील सत्ताधारी आघाडीच्या तिन्ही पक्षांनी या प्रस्तावावर सहमती दर्शवली आहे. अद्याप याची अंमलबजावणीची अधिकृत तारीख जाहीर झालेली नाही, मात्र जून महिन्याच्या अखेरपर्यंत या कायद्याचा मसुदा तयार केला जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर हा नियम संपूर्ण देशात लागू होईल.


**ठराविक अॅप्सवर नाही, तर 'अल्गोरिद्म'वर बंदी!**

विशेष म्हणजे, सरकार कोणत्याही एका ठराविक सोशल मीडिया अॅपचे नाव घेणार नाही. त्याऐवजी, जे प्लॅटफॉर्म्स मुलांना व्यसनात पाडणारे अल्गोरिद्म वापरतात किंवा जिथे मुलांसाठी अयोग्य मजकूर आहे, अशा सर्व प्लॅटफॉर्म्सवर कारवाई केली जाणार आहे. यामध्ये फेसबुक, इन्स्टाग्राम, टिकटॉक सारख्या मोठ्या कंपन्यांचा समावेश असू शकतो.

**जगभरात वाढता कल**

सोशल मीडियावर बंदी घालणारा ऑस्ट्रिया हा पहिलाच देश नाही. यापूर्वी ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांसाठी, तर फ्रान्सने १५ वर्षांखालील मुलांसाठी अशाच प्रकारचे कडक नियम मंजूर केले आहेत. आता ऑस्ट्रियाच्या या निर्णयामुळे जगभरात 'डिजिटल फ्रीडम' विरुद्ध 'चाइल्ड सेफ्टी' अशी नवी चर्चा रंगू लागली आहे.

# 'आरएसएस'चे संस्थापक डॉ. केशव हेडगेवार



## निमित्त

डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्म १ एप्रिल १८८९मध्ये एका गरीब ब्राम्हण कुटुंबात झाला. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) संस्थापक राहिले आहेत. त्यांनी लावलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे.

हेडगेवार लहानपणापासूनच क्रांतीकारी विचाराचे होते. त्यांच्या लहानपणीची एक गोष्ट अशी की, ते जेव्हा शाळेत शिकत होते, तेव्हा त्या शाळेची तपासणी करण्यासाठी एक इंग्रजी अधिकारी आला होता. हेडगेवार यांनी त्या वयात त्या अधिकाऱ्याच्या शाळा तपासणीला विरोध केला तसेच आपल्या काही मित्रांना एकत्र करत अधिकाऱ्याविरोधात भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. हेडगेवारांचे शिक्षण त्यांच्या मोठ्या भावाने केले. मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर, १९१० साली ते वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी कोलकत्त्याला गेले. तरुणपणात त्यांनी सशस्त्र क्रांतीत सहभाग घेतला होता. शाळेत असताना त्यांनी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाला ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल वाटण्यात आलेली मिठाई रागाने फेकून दिली होती तसेच पुढे 'वंदे मातरम'चा घोष केल्याबद्दल त्यांना शाळेतून काढूनदेखील टाकण्यात आले होते.


बंगालमधील प्रत्यक्ष क्रांतिकार्यात सहभाग घेता यावा यासाठी त्यांनी आपले उच्चशिक्षण जाणीवपूर्वक कोलकातामध्ये पूर्ण केले. तेथे ते अनुशीलन समिती या क्रांतिकारी संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते बनले. पुढे त्यांनी १९२५ साली दसरा अर्थात विजयादशमीच्या दिवशी संघाच्या पहिल्या शाखेची स्थापना केली. डॉक्टरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला एक वेगळे तत्त्वज्ञान व वेगळ्या प्रकारची कार्यपद्धती दिली. त्या पायावरच रा. स्व. संघ हा गेली अनेक वर्षे यशस्वीरीत्या कार्यरत आहे. क्रांतिकार्यातील आपले जुने सहकारी सोबत घेऊन त्यांनी नागपुरात एका पडक्या वाड्यात संघाची पहिली शाखा सुरू केली. चारित्र्यसंपन्न व्यक्तिनिर्माण व त्या आधारावर राष्ट्रनिर्माण या अंतिम ध्येयाचा विचार त्यांनी संघस्थापनेच्या माध्यमातून केला. डॉ. हेडगेवार हे कुशल संघटक, मार्गदर्शक व नेते होते. त्यांच्याच प्रेरणादायी नेतृत्वामुळे गोळवलकर गुरूजी, बाळासाहेब देवरस, भैय्याजी दाणी, एकनाथ रानडे, पं. दीनदयाळ उपाध्याय यासारखे नेते, कार्यकर्ते देशाला मिळाले. १९२५ म्हणजेच संघाच्या स्थापनेपासून ते १९४० त्यांच्या मृत्यूपर्यंत असे पंधरा वर्ष डॉक्टर हेडगेवार सतत देशभर भ्रमण करत होते. त्यांनी संघाच्या माध्यमातून एक-एक माणूस जोडण्याचे कार्य केले. त्यांच्या कष्टाचे फळ म्हणजे आज संघाचा महाकाय वटवृक्ष झाला आहे. लाखो कार्यकर्ते आज संघासाठी काम करत आहे.

सच्चे नेतृत्व, त्याग, सेवा, समर्पण भावना, दूरदर्शी विचार आणि शिस्तबद्ध, निश्चल व व्रतस्थ कार्यजीवनशैली ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध अंगे होती. २१ जून १९४० रोजी डॉक्टरांचे निधन झाले. त्यापूर्वी एक वर्ष आधी त्यांनी संघाच्या कार्यपद्धतीबाबत संघस्वयंसेवकांसाठी काही निर्देश देऊन ठेवले. संघाची निश्चित अशी कार्यपद्धती तयार झाली. आपल्या पश्चात संघटनेला ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक असलेली शिदोरीच जणू त्यांनी संघाला अर्पण केली.

**हेडगेवारांवरील मराठी पुस्तके**

गोष्टीरूप हेडगेवार, मला उमगलेले डॉक्टर हेडगेवार, युगप्रवर्तक डॉ. हेडगेवार, डॉ. हेडगेवार. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### महिलांच्या शरीरातील चरबी कमी करण्याचे उपाय

महिलांच्या शरीररचनेत हार्मोन्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. विशेषतः इस्ट्रोजेन हा हार्मोन शरीरात फॅट कुठे साठवले जाईल हे ठरवतो. महिलांमध्ये इस्ट्रोजेनचे प्रमाण जास्त असल्यामुळे शरीरात फॅट्स कंबरेखालील भागात म्हणजेच मांडी, नितंब आणि हातांमध्ये जास्त प्रमाणात साठतात. अनेक महिलांना हा त्रास वाटतो आणि तो केवळ दिसण्यापुरता मर्यादित नसून आत्मविश्वासावरही परिणाम करतो, पण हे जैविकदृष्ट्या नैसर्गिक आहे. महिलांचे शरीर भविष्यातील ऊर्जा साठवण्यासाठी आणि प्रजननासाठी ही रचना तयार ठेवते.



याशिवाय, महिलांच्या शरीरात स्नायूंचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आणि फॅट टक्केवारी जास्त असते. स्नायू जितके कमी तितका मेटाबॉलिझम कमी असतो, त्यामुळे शरीरात जास्त कॅलरीज फॅटच्या स्वरूपात साठवल्या जातात. यामुळे विशेषतः दंड आणि मांडीच्या भागात चरबी लवकर वाढते. वयानुसारही हा बदल अधिक जाणवतो, कारण वय वाढल्यावर मेटाबॉलिझम मंदावतो आणि हार्मोनल बदल होतात.

तसेच, दीर्घकाळ बसून राहणे, हालचालींचा अभाव आणि चुकीचा आहार हेही महत्त्वाचे कारण ठरतात. जास्त तेलकट, गोड किंवा प्रोसेस्ड फूड खाल्ल्यास शरीरात अतिरिक्त कॅलरीज जमा होतात. त्या लगेच वापरल्या जात नाहीत आणि त्या विशिष्ट भागांमध्ये साठतात. विशेषतः मांडी आणि हातांमध्ये फॅट जमा होण्याची प्रवृत्ती अधिक असते.

या समस्येवर उपाय म्हणून सर्वप्रथम नियमित व्यायाम करणे अत्यावश्यक आहे. केवळ चालणे पुरेसे नसून स्ट्रेंथ ट्रेनिंग करणे महत्त्वाचे आहे. हातांसाठी पुश-अप्स, ट्रायसेप डिप्स, डंबेल एक्सरसाइज यांचा समावेश करावा. मांडीसाठी स्क्वॅट्स, लंजेस, लेग रेजेस यांसारख्या व्यायामांचा फायदा होतो. हे व्यायाम स्नायू मजबूत करतात आणि फॅट कमी करण्यास मदत करतात.

आहारातही बदल करणे गरजेचे आहे. प्रथिनयुक्त आहार घेतल्यास स्नायू वाढण्यास मदत होते आणि मेटाबॉलिझम सुधारतो. डाळी, कडधान्ये, दूध यांचा आहारात समावेश करावा. साखर आणि मैद्याचे पदार्थ कमी करणे आवश्यक आहे. तसेच भरपूर पाणी पिणेही महत्त्वाचे आहे, कारण त्यामुळे शरीरातील टॉक्सिन्स बाहेर पडतात आणि फॅट कमी होण्यास मदत होते. त्यामुळे या गोष्टी अगदी सामान्य आहेत. प्रत्येकीच्या शरीराची रचना वेगळी असते.

# रेवदंडा एसटी बसस्थानक आवारात अपघाताला निमंत्रण

## आवारात खड्डेच खड्डे आणि बाहेरील वाहनांची अनधिकृत पार्किंग

**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्रवासीवर्गाचे जिव्हाळ्याचे असलेले रेवदंडा एसटी बसस्थानक आवारात पडलेले मोठे खड्डे व स्थानकांच्या आवारात बेशिस्तीने केलेली वाहन पार्किंग यामुळे अपघातास निमंत्रण ठरते, भविष्यात आवारात सर्वत्र पडलेले मोठे खड्डे व बेशिस्त अनधिकृत वाहने पार्किंग स्टँड यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता संभवते.



रेवदंडा एसटी बस स्थानक अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला मध्यवर्ती ठिकाण आहे, नित्याने तिन्ही तालुक्यात येथून एसटी बसेस जा-ये करत असतात. येथूनच मुंबई, पुणे, ठाणे, शिर्डी, आदी महाराष्ट्रात मुरूड एसटी डेपोच्या दुरवर जात असलेल्या एसटी बसेस थांबा आहे. या एसटी बस स्थानकांत प्रवासीवर्ग व स्थानिकांचे वर्दळ असल्याने नित्याची गर्दी आढळते.

रेवदंडा एसटी बस स्थानक आवारात पावसाळ्यात मोठे मोठे खड्डे निर्माण झाले होते, या खड्डात पावसाळ्यात पाणी साचून तळी निर्माण झाली होती. सध्या पावसाला नसल्याने खड्डयात पाणी नाही, मात्र भले मोठे खड्डे तसेच आहेत, स्थानकांच्या आवारात एसटी बसेस ये-जा करत असताना या खड्डाने बसेसमधील प्रवाशांना धक्का बसतो, तसेच खड्डे चुकविताना वाहन चालकांचीसुध्दा भंबेरी उडते, यावेळी स्थानकांच्या आवारातील प्रवाशीवर्ग अथवा स्थानिकांना बसेस चालकांचे खड्डे चुकविण्याचे प्रयत्नात धक्का लागून अपघात होण्याची निश्चित शक्यता संभवते. त्यामुळे भविष्यात एसटी स्थानकांचा आवारात खड्डे चुकविताना अपघातास निमंत्रण ठरत आहे. शिवाय एसटी स्थानक आवारात बेशिस्तीने लहान मोठी वाहने अनाधिकृतपणे पार्किंक नित्याची असते.

या अनाधिकृत पार्किंगने एसटी बसेस ये-जा करताना अडथळा होत असतो. खड्डे व बेशिस्त पार्किंग यामुळे रेवदंडा एसटी बस स्थानकांस निश्चितपणे अपघातास निमंत्रण ठरत आहे.

बस स्थानक आवारातील रस्ता संबधीतानी पुनस्य: करावा, अशी मागणी पावसाळ्यापासून प्रवासीवर्ग करत आहेत, मात्र संबधीत बस स्थानक आवारातील रस्त्याची दुरवस्था दुर्लक्षीत करत असल्याने प्रवासीवर्ग व स्थानिक ग्रामस्थ संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

# रोह्यातील अंबिका माता मंदिराचा वर्धापन दिन

**रोहा : प्रतिनिधी**

संपूर्ण देशभरात अंबिका मातेवरील श्रद्धा असणारे भाविक चैत्र नवरात्री भक्तिभावाने साजरी करतात आणि या नवरात्रीमध्ये अंबिका माता यांना शक्तीरूपात त्यांचे भाविक मानतात. या अनुषंगाने रोहा शहरातील अंबिका धाम येथील अंबिका माता मंदिरात वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मातेचे भक्त मोठ्या प्रमाणात मंदिरात उपस्थित होते. विशेषतः महिला भक्तांची उपस्थिती लक्षणीय होती.



चैत्र नवरात्र उत्सव निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन अंबिका धाम मंदिरात गुजराती समाज व रोहेकरांच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. यावेळी विशेषतः सर्व धर्मातील महिला वर्गानी विविध प्रकारच्या प्रसादाचे ( ५६ भोग ) मातेला अर्पण करण्यासाठी आणले होते.

विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये सकाळी केशर स्नान, मंगल आरती, ध्वजारोहण,नवचंडी महायज्ञ, सायंकाळी महाआरती, रात्री भजन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माजी आ. अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, मा. नगराध्यक्ष समीर शेडगे, गट नेते महेंद्र गुजर, सभापती राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, रवि चाळके, निता हजारे, स्नेहा आंब्रे, संजना शिंदे, मंदिराचे विश्वस्त सुरेश शहा, गुजराती समाज अध्यक्ष भावेश दामाणी, महीला अध्यक्षा दक्षा शहा, जगदिश दामाणी, विलास गुजर, मिलन शाह, सुरेश मेहता, राकेश पटेल आदी उपस्थित होते.

# माणगावात भगवान महावीर जयंती उत्साहात

**माणगाव :** येथे जैन समाज संघटनेतर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भगवान महावीर जयंती मंगळवार, ३१ मार्च २०२६ रोजी विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त माणगाव शहरातून भगवान महावीर यांच्या प्रतिमेची मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. या सर्व कार्यक्रमात माणगाव जैन समाज संघटनेचे कोकण विभाग जैन संघटना अध्यक्ष रमेश शं.जैन, जैन समाज माणगाव अध्यक्ष मुकेश अ. जैन, सचिव मुकेश जैन, संजय ओसवाल, ललित ओसवाल, मदनलाल जैन, सुरेश भ.जैन, सुरेश जैन, अशोक जैन, नरेश जैन, प्रवीण गांधी, प्रकाश मेहता, राजेश छेडा, संजय जैन, शांतीलाल जैन, महावीर जैन,राजू जैन, भरत जैन, पंकज जैन, जितेंद्र जैन, चिराग जैन, प्रथम जैन आदींसह माणगाव व गोरेगाव भागातील जैन समाजाचे बांधव - भगिनी यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन भगवान महावीर जयंती उत्साहात साजरी केली.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे - अजिवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| २२/६ | ०-२७-६०<br>पो.ख ०-०३-३०<br>एकूण ०-३०-९०<br>पैकी ०-१६-०० | ६.३१ | नामदेव वळकुंदया माळी |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ३१/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१


# ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलमची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई यांच्या वतीने रोहा तहसीलदार यांना ओबीसींसाठी जनगणनेत स्वतंत्र कॉलम असावा, या महत्त्वपूर्ण मागणीसंदर्भात निवेदन देण्यात आले. हे निवेदन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री, जनगणना आयुक्त तसेच राज्याचे मुख्यमंत्री यांच्यापर्यंत पोहचविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.



कुणबी समाजोन्नती संघाकडून रोहा तहसीलदारांना निवेदन

एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत सुरू होणाऱ्या जनगणना २०२७च्या पहिल्या टप्प्यातील प्रश्नावलीत अनुक्रमांक १२वरील प्रश्नांमध्ये अनुसूचित जाती व जमातींसोबतच इतर मागासवर्गीय (ओबीसी) घटकांचाही समावेश करण्यात यावा तसेच त्यासाठी स्वतंत्र कॉलम देण्यात यावा यासाठी नवीन अधिसूचना प्रसिद्ध करण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी संघाचे उपाध्यक्ष शंकरराव म्हसकर, ओबीसी रायगड जिल्हाध्यक्ष तसेच पंचायत समिती रोहा येथील नवनिर्वाचित सदस्य सुरेश मगर, रायगड जिल्हा समन्वयक समितीचे अध्यक्ष शिवराम महाबळे, तालुका अध्यक्ष रामचंद्र सकपाळ, तालुका सरचिटणीस सतीश भगत, सहचिटणीस मोरेश्वर खरिवले आदी मान्यवर उपस्थित होते.

# संजय वढावकर यांचा सत्कार

**धाटाव :** निलिकॉन कामगारांच्या वेतन वाढ व सेवा शर्तीबाबत नुकताच १२ हजार रुपये वेतन वाढीचा व इतर सुविधा देण्याबाबतचा करार झाला. या निमित्ताने कामगारांच्या वतीने जनरल मजदूर सभा ठाणे या युनियनच्या पदाधिकाऱ्यांच्या जाहीर सत्कार सोहळा झाला.

यावेळी जनरल मजदूर सभा युनियनचे जनरल सेक्रेटरी संजय सूर्यकांत वढावकर तसेच अध्यक्षा संज्योत वढावकर यांचा वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

# अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर

**चौक : प्रतिनिधी**

अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाची (रजि.) त्रैवार्षिक जाहिर परिषद पिंपरी दहिसर मोरी या कोयना प्रकल्पग्रस्त वसाहतीत झाली. या परिषदेत नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. ही परिषद उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

परिषदेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.संघाचे सरचिटणीस लक्ष्मण जाधव यांनी मागील तीन वर्षाच्या कामकाजाचा आढावा घेतला. उपस्थित प्रकल्पग्रस्त यांनी विविध समस्या उपस्थित केल्या. सेवा संघाने सरकारशी संवाद साधून कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन करण्यात आले. परिषदेत पुढील तीन वर्षासाठी नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पांडुरंग साळुंखे आणि एम.डी.चाळके यांनी कामकाज केले.

अध्यक्ष पवन राजाराम कदम,कार्याध्यक्ष किसन धोंडिबा जाधव, उपाध्यक्ष सुभाष अर्जुन सावंत,उपाध्यक्ष विलास विठाई भागोजी शिंदे, उपाध्यक्ष इंद्रजीत बाबाजीराव मोरे, उपाध्यक्ष आनंद लक्ष्मण सकपाळ,सचिव अशोक बनाबाई जानू मरागजे, सहसचिव निलेश दगडू जाधव, सहसचिव अनंत शिवराम निकम, खजिनदार नारायण लक्ष्मण कदम, तसेच जिल्हानिहाय अध्यक्ष व सचिवांची निवड करण्यात आली. नवीन पदाधिकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून पुनर्वसित बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. यावेळी जेष्ठ नेते बळीराम शिंदे, दिलीप कदम,विजय मोरे, किसन भोसले, राजाराम मुसळे, उमेश कदम, डी.डी.मरागजे, सुरेश सकपाळ, सुमित कदम, संतोष कदम, जगन्नाथ साळुंखे, आजी माजी पदाधिकारी व प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **14 दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे — देहरंग, तालुका — पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट क्रमांक / उपविभाग नंबर | क्षेत्रफळ आर. चौ.मी. | आकार रू. पै. | नाव |
|---|---|---|---|
| १/ग/३८ | ६.३०.०० | ६३.०० | श्री. उदय अनंत दिवेकर |

**पनवेल.**
**दिनांक 31/03/2026.**

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
शॉप नं. 13, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर 4, सेक्टर नंबर 5, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. नं. ९०२२३१७७७२.


# श्रीवर्धनमध्ये महावितरण कार्यालयाचे स्थलांतर गैरसोयीचे; ग्राहकांचे हाल

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरातील वीज ग्राहकांसाठी एकेकाळी अत्यंत सोयीस्कर ठरणारे महावितरणचे कार्यालय स्थलांतरानंतर आता गैरसोयीचे ठरत असून, शहरात पुन्हा मध्यवर्ती ठिकाणी वीज बिल भरणा केंद्र सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. ग्राहकांच्या दैनंदिन अडचणींच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न आता दखलपात्र ठरत आहे.

पूर्वी श्रीवर्धन बसस्थानकासमोर कार्यरत असलेले महावितरण कार्यालय शहर तसेच आसपासच्या ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त होते.

वीज बिल भरणे, तक्रारी नोंदवणे, नवीन जोडणीसाठी अर्ज करणे यांसारखी सर्व कामे एकाच ठिकाणी सहज पूर्ण होत होती, मात्र २०२१ साली हे कार्यालय श्रीवर्धनबोर्लीपंचतन मार्गावरील खेर्डीआराठी परिसरात स्थलांतरित करण्यात आले. हे ठिकाण शहराच्या मध्यवर्ती भागापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असल्याने ग्राहकांसाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे.

कार्यालयाजवळ थेट बसथांबा नसल्याने तसेच मिनीडोर वाहतूक मर्यादित वेळेत उपलब्ध असल्याने अनेकांना बसस्थानकापासून रिक्षाने प्रवास करावा लागतो. वाढत्या भाड्यामुळे ग्राहकांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असून, साध्या बिल भरण्यासाठीही खर्चिक प्रवास करावा लागत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, सध्या वीज बिल भरण्यासाठी श्रीवर्धनमधील एका खासगी बँकेत सुविधा उपलब्ध असली तरी, चुकीचे बिल, मीटर बिघाड, वीजपुरवठा खंडित होणे अशा समस्यांसाठी लेखी तक्रार करणे आवश्यक असते, मात्र या तक्रारींसाठी पुन्हा दूरच्या कार्यालयात जावे लागत असल्याने ग्राहकांची गैरसोय अधिक वाढते.

# डिजिटल शेतीशाळा प्रशिक्षणात सहभागी होण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड आणि नैसर्गिक आपत्तीमुळे पारंपरिक कोरडवाहू शेती संकटात सापडली असून उत्पादन खर्च वाढत आहे. यावर मात करण्यासाठी कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पा मार्फत महाराष्ट्र राज्या करिता हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान सुरू केले आहे. हे अभियान शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची हमी देणे या उद्देशाने राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाबरोबरच कृषी विद्यापीठे कृषी विज्ञान केंद्रे उमेद, पशुसंवर्धन विभाग इत्यादी यंत्रणादेखील सहभागी होत आहेत.

या अभियानाचा एक टप्पा म्हणजे हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर आधारित विशेष डिजिटल शेतीशाळाचे आयोजन नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२६ महिन्यात एकूण ४ विशेष डिजिटल शेतीशाळा आयोजित करण्यात येत आहेत. राज्यातील सर्व प्रकारच्या पीक पद्धतींना उपयुक्त असणाऱ्या तंत्राची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तंत्रज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांच्यामार्फत या डिजिटल शेती शाळांमध्ये तंत्रज्ञानाचे आदान प्रदान होणार आहे.

**विशेष डिजिटल शेतीशाळेचे वेळापत्रक आणि विषय पुढीलप्रमाणे**

पहिली शेतीशाळा १ एप्रिल २०२६ रोजी होणार असुन त्यामध्ये पेरणीपूर्व तंत्रज्ञान, बेड तयार करणे व बेडवर टोकन करणे शून्य किंवा कमीत कमी मशागत करणे, आंतरपीक पद्धत, बियाणे उगवण क्षमता तपासणी आणि बीज प्रक्रिया आदी माहिती दिली जाणार आहे .

दुसरी शेतीशाळा ८ एप्रिल २०२६ रोजी होणार असुन जैविक व नैसर्गिक निविष्ठा उत्पादन, बीजामृत, जीवामृत, लिंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, ट्रायकोडर्मा तयार करण्याच्या पद्धती व फायदे विशद केले जाणार आहेत.

तिसरी शेतीशाळा १५ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आली असून एकात्मिक कीड व्यवस्थापन, सापळा पिके, पक्षी थांबे, चिकटसापळे, मित्र कीटकांचे संवर्धन, लिंबोळी आणि दशपर्णी अर्काचा वापर या विषयांवर चर्चा केली जाईल.

आणि चौथ्या शेतीशाळेचे आयोजन २२ एप्रिल २०२६ रोजी होणार असून त्यामध्ये भात शेतीसाठी सुधारित लागवड तंत्र, भाताची थेट पेरणी, (DSR), पद्धत आणि भात लावण्यासाठी यांत्रिकी पद्धत या विषयांवर सखोल मार्गदर्शन होणार आहे.

सर्व शेतीशाळा वर नमूद तारखांना सायंकाळी ७:३० वाजता सुरू होणार असून या शेती शाळांचे लाईव्ह (LIVE) प्रसारण कृषी विभाग नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पाणी फाउंडेशन आणि उमेदच्या YouTube चॅनलवर केले जाणार आहे.

शेतकरी महिला, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य, कृषी मंडळे, बीज उत्पादक, फार्मर कप स्पर्धेमध्ये भाग घेऊ इच्छिणारे निमंत्रक व शेतकरी गट, वनपट्टेधारक या सर्वांनी मोठ्या संख्येने डिजिटल शेती शाळांना सहभागी व्हावे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मुरुड- जंजिरा यांच्यामार्फत देण्यात आली आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे उमरोली ता. पनवेल, जि रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेला बिनशेती भुंखड विद्यमान कब्जेदार दीपा विल्सन डेविड यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर बिनशेती भुंखडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**बिनशेती भुंखडाचे वर्णन**

मौजे उमरोली, ता. पनवेल, जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट कमांक व उपविभाग | क्षेत्र | आकार | कब्जेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| ९१/८ | २९९ चौ.मी | २९-९० | दीपा विल्सन डेविड |

वरील सदर मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ३१/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९



अर्जदारातर्फे वकील
ॲड. उज्वला तेटगुरे

***मे. दिवाणी न्यायाधिश क स्तर पनवेल यांचे कोर्टात***

चौकशी अर्ज क्र 327/2026
नि 8/ड
नेता .27/04/2026

1. श्रीमती रूचिका जगदीश पलभाटकर
2. श्री. नित्याय जगदीश पलभाटकर
3. कु. सिध्दी जगदीश पलभाटकर ........अर्जदार

**जाहिर नोटीस**

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी कै. जगदीश गजानन पलभाटकर यांचे दिनांक 03/02/2024 रोजी सदनिका क्र. टी 2, तिसरा मजला, ओम शांती को.ऑप. हौ.सो.लि., सेक्टर 8, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी निधन झाले आहे. कै. जगदीश गजानन पलभाटकर यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कामोठे, ता. पनवेल जि. रायगड येथील सदनीका मिळकत ओम - शांती को ऑप. हौ.सो.लि., सदनिका क्र. टी-2, तिसरा मजला, प्लॉट नं. 6, सेक्टर 8, क्षेत्र 490 चौ. फुट. बिल्टअप.**

मयत कै. जगदीश गजानन पलभाटकर यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत के. जगदीश गजानन पलभाटकर यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक 31/03/2026 रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपिक**
**दिवाणी न्यायालय**
**(क स्तर) पनवेल, जिल्हा रायगड**

(शिक्का)

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**(क स्तर) पनवेल, जिल्हा रायगड**

# कोपरखैरणेतून साडेअकरा लाखांचे एमडी जप्त

## पाणी वितरण करताना अमली पदार्थांचा धंदा ▌ दोघांना अटक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोपरखैरणे परिसरातून दोन संशयित व्यक्तींना ताब्यात घेत झडती घेतली असता त्यांच्याकडे ११ लाख ६० हजार रुपयांचे एमडी (मेफेड्रोन) या अमली पदार्थांची भुकटी आढळून आली. त्या दोन्ही संशयितांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स पथकाने केली आहे.



मोहम्मद फैज अली खान (वय २४) आणि अल्ताफ मुन्ना शेख असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. यातील मोहम्मद फैज हा कोपरखैरणे भागात स्वच्छ पाण्याचे कॅन वितरण करणारा आहे तर अल्ताफ बेरोजगार आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नाश मुक्ती अभियान जोरकस पणे राबवता त्यांना अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचीही साथ मिळत आहे. त्यांनी आतापर्यंत लाखो रुपयांचा अमली पदार्थ जप्त केला आहे.

अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उदयसिंग काळे यांनी घटना स्थळाला भेट दिली होती. तर या गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस उपनिरीक्षक सिंघू मुंढे या करीत आहेत. अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स विभागाला कोपरखैरणे भागात एमडी वितरण करण्यासाठी काही युवकांचा सहभाग असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे कोपरखैरणे भागात गस्त सुरु केली होती. २९ तारखेला अपरात्री सव्वा दोनच्या सुमारास गस्त घालत असताना सेक्टर ९ येथून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मार्गावर दोन युवक संशयास्पदरित्या जात असताना आढळून आले. त्यांना ताब्यात घेत त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्य कडे ५८ ग्रॅम वजनाची एमडी पावडर आढळून आली.

पथकाने तात्काळ त्यांच्या अटक केली व कोपरखैरणे पोलीस ठाण्यात अमली पदार्थ विरोधी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. संशयित आरोपी कडून ११ लाख ६० हजार रुपयांची एमडी पावडर ३० हजार रुपयांचा आयफोन आणि १५ हजार रुपयांचा स्मार्ट फोन असा एकूण १२ लाख पाच हजार रुपयांचा ऐेजव जप्त करण्यात आला आहे.

यातील मोहम्मद हा आरोपी कोपरखैरणे भागात स्वच्छ पाण्याची कॅन वितरण करण्याचे काम करतो. पाणी अथवा खाद्य पदार्थ डिलेव्हरी करणारा कोणीतरी अमली पदार्थ वितरण करत असल्याचा हा पहिलाच प्रकार आहे. पाणी वितरण करण्याच्या धंद्याआड तो अमली पदार्थ कोणाकोणाला वितरित करीत होता याचाही तपास पोलीस करीत आहेत.

# नवी मुंबई विमानतळ व्यवस्थापन समितीची कार्यकारिणी जाहीर

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत घोषणा

**नवी मुंबई : बातमीदार**

अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व्यवस्थापन समितीच्या कार्यकारिणीची भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी घोषणा करण्यात आली.



भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रवींद्र चव्हाण यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे सरचिटणीस सुहास माटे, संयुक्त सरचिटणीस रुपेश धुमाळे, संयुक्त सरचिटणीस योगेश आवळे, उपाध्यक्ष साई घोगळे, सचिव शरद येटम, कार्यकारी अध्यक्ष जितेंद्र राऊत, निशांत गायकवाड यांच्यासह कमर्चारी संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी अखिल भारतीय माथाडी संघटनेची कार्यकारिणी ही घोषित करण्यात आली.

यावेळी रवींद्र चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये तळागाळातील प्रत्येक घटकाला न्याय देणे, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन प्रशासन समन्वयातून सर्वांनी मिळून काम करायचे आहे . कोणावरही अन्याय होणार नाही आणि अन्याय आम्ही करणार नाही या भूमिकेतून काम करण्याची पद्धत अवलंबत न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

नवी मुंबई विमानतळ व्यवस्थापन समितीच्या कार्यकारिणीमध्ये संयुक्त सरचिटणीस रूपेश धुमाळे, उपाध्यक्ष किरण पवार, युहान केर्सी दोराबाजी आणि सुजित न्यायनिर्गुणे यांची तर सचिव म्हणून प्रभुदास भोईर, मुखांश नाईक, गजानन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अखिल भारतीय माथाडी संघटनेची कार्यकारिणी घोषीत झाली त्यात रायगड जिल्हा अध्यक्षपदी जितेश शिंदे, भिवंडी पालघर जिल्हा उपाध्यक्षपदी सचिन जोशी, ठाणे उरण उपाध्यक्षपदी विक्रांत भोसले, दक्षिण मुंबई उपाध्यक्षपदी राहुल लहासे, वरळी विधानसभा अध्यक्षपदी शैलेश तोडकरी आणि वरळी विधानसभा सरचिटणीसपदी समीर शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# वाढते वणवे रोखण्यासाठी नागरिकांनी सक्रिय होण्याचे आवाहन

**उरण : बातमीदार**

दवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत आहे.उन्हाच्या तीव्र झळांनी प्राणी, पक्ष्यांची तगमग होत असताना, जैवविविधताही धोक्यात आली आहे. या काळात लागणाऱ्या वणव्यांमुळे निसर्ग संवर्धन करण्यासाठी वणवे रोखण्याचे आवाहन 'फ्रेंड्स ऑफ नेचर' या निसर्गप्रेमी संस्थेने केले आहे.

अनेकदा वाढत्या उष्णतेमुळे वणवे लागतात. काही ठिकाणी जाणीवपूर्वक आगी लावल्या जातात. अनेकदा वणवे नियंत्रणात आणण्यासाठी वनखात्याला मर्यादा येत असताना नागरिक त्याकडे दुर्लक्ष करतात. दरम्यान, कुठे वणवा लागल्यास वनविभागाच्या १९२६ या मदत क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जयवंत ठाकूर यांनी केले आहे.

पशु पक्षी वन्य जीवांचे तसेच निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेने आजपर्यंत जंगले, पशु पक्षी निसर्गाचे मोठया प्रमाणात रक्षण केले आहे, मात्र अनेकदा उन्हाळा सुरु होताच वनांना, जंगलाला मोठया प्रमाणात आग लागते. हि आग कधी कधी नैसर्गिकपणे लागते तर काही समाज कंटक हे आग लावतात त्यामुळे पर्यावरणाचे मोठया प्रमाणात नुकसान होते.

पशु पक्ष्याचे अस्तित्वात धोक्यात येते त्यामुळे फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन ) या संस्थेने कोणतेही अनुचित घटना, वणवा, आग लागली असल्यास वन विभागाच्या १९२६ नंबर वर संपर्क करावे, असे आवाहन केले आहे.

# इन्फिनिटी फाऊंडेशनचा वर्धापन दिन उत्साहात

## संकेतस्थळ व ई-बुकचे लोकार्पण

**कळंबोली : बातमीदार**

इन्फिनिटी फाऊंडेशनचा ११वा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील तसेच मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली. दरम्यान, सोमवारी नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते इन्फिनिटी फाऊंडेशनच्या संकेतस्थळ व ई-बुकचे लोकार्पण करण्यात आले.



यावेळी नगरसेविका राजेश्री वावेकर, सिनेट मेम्बर मुंबई विद्यापीठ मयुरेश नेतकर, डॉ. हीना सामनाई, निशा नायर, सगीरा शाफिक, डॉ. सीमा कांबळे यांची उपस्थिती लाभली. यावेळी इन्फिनिटी फाऊंडेशन संस्थेच्या विविध उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला. गेल्या दहा वर्षांत इन्फिनिटी फाऊंडेशनने युवक विकास, पर्यावरण संवर्धन, सामाजिक जनजागृती, आदिवासी विकास, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या सोहळ्यात संस्थेच्या संस्थापक सदस्य वैशाली सरदेशपांडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेच्या मॅनेजिंग कमिटी सदस्यांना नियुक्ती पत्रांचे वितरण करण्यात आले. यासोबतच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना सल्लागार समिती सदस्य म्हणून निवड करून त्यांचा सत्कार करण्यात आला.


संस्थेचे अध्यक्ष आयुफ आकुला म्हणाले की, इन्फिनिटी फाऊंडेशनचा हा १० वर्षांचा प्रवास हा केवळ एका संस्थेचा नसून युवकांच्या सामूहिक शक्तीचा आणि समाजसेवेच्या भावनेचा प्रवास आहे. आम्ही आतापर्यंत ३७५ हून अधिक सामाजिक उपक्रम राबवून समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचलो आहोत. पुढील काळातही युवकांना सोबत घेऊन समाजासाठी अधिक व्यापक कार्य करण्याचा आमचा संकल्प आहे.

कार्यक्रमास इन्फिनिटी फाऊंडेशनचे अध्यक्ष आयुफ आकुला, उपाध्यक्ष मिहीर रेडीज, वेदांतिकारा जाधव, सचिव प्रणय उसाटकर, यश दुबे तसेच सदस्य, स्वयंसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी मुंबई विमानतळावरून ४६ शहरांसाठी उड्डाणे

**उरण : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या उन्हाळी वेळापत्रकाची घोषणा करण्यात आली असून, २९ मार्च ते २४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत तब्बल ४६ शहरांसाठी थेट उड्डाणे सुरू होणार आहेत. या निर्णयामुळे नवी मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशाच्या दळणवळण सुविधेत मोठी भर पडणार आहे.



नव्या वेळापत्रकात ३० नवीन मार्गाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांना देशातील प्रमुख शहरांमध्ये अधिक वेगवान आणि थेट प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. विशेषतः दिल्ली, गोवा, बेंगळुरू आणि कोचिन या शहरांसाठी सर्वाधिक उड्डाणे नियोजित आहेत. याशिवाय हैद्राबाद, कोलकाता, लखनौ, वाराणसी आणि इंदूर या शहरांनाही नियमित सेवा मिळणार आहे. या विस्तारासाठी इंडिगो, अकासा एअर आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या प्रमुख विमान कंपन्या अतिरिक्त उड्डाणे चालवणार आहेत.आठवड्याला १,०९२ उड्डाणे होतील

उन्हाळी वेळापत्रक लागू झाल्यानंतर विमानतळावरील उड्डाणांची संख्या लक्षणीयरीत्या वाढणार आहे. आठवड्याला सुमारे १,०९२ उड्डाणे अपेक्षित असून, दररोज सरासरी १५६ उड्डाणे होतील. सुरुवातीला दररोज २२ उड्डाणांपासून सुरू झालेली सेवा एप्रिल २०२६ पर्यंत वाढून ७८ उड्डाणांपर्यंत जाणार आहे. त्यामुळे विमानतळाची कार्यक्षमता आणि प्रवासी हाताळण्याची क्षमता अधिक बळकट होईल. टियर-१ आणि टियर-२ शहरांशी थेट कनेक्टिव्हिटी वाढल्याने उद्योग, पर्यटन आणि व्यवसाय क्षेत्राला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

२९ मार्च ते २४ ऑक्टोबर दरम्यानचे वेळापत्रकाची वैशिष्ट्ये ४६ शहरांसाठी थेट उड्डाणे, ३० नवीन मार्गाचा समावेश, १५६ दररोज सरासरी उड्डाणे, १,०९२ आठवड्याला उड्डाणे होतील.

# जागतिक क्षयरोग दिनानिमित्त सीएमई सत्र उत्साहात

**पनवेल :** जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर येथे क्षयरोग (टीबी) विषयक कंटिन्यूइंग मेडिकल एज्युकेशन (सीएमई) सत्र झाले. या सत्राचे आयोजन HLFPPT व SSHAKTI प्रकल्पांतर्गत मेडिकव्हर हॉस्पिटल आणि नॅशनल ट्युबरक्युलोसिस एलिमिनेशन प्रोग्राम (NTEP) यांच्या सहकार्याने, जिल्हा क्षयरोग केंद्र रायगड यांच्या समन्वयाने करण्यात आले होते.

या कार्यक्रमास सिटी टीबी ऑफिसर, पनवेल डॉ. उषा नाईक व जिल्हा टीबी अधिकारी, रायगड डॉ.प्राची नेहुलकर यांचे मार्गदर्शन लाभले. सत्रात सुमारे ३५ डॉक्टर व रुग्णालयातील कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी डॉ.ज्योती सालवी (WHO सल्लागार, NTEP) यांनी 'NTEP मार्गदर्शक तत्त्वे, औषध-प्रतिरोधक क्षयरोग (DR-TB) आणि क्षयरोग प्रतिबंधक उपचार (TPT)' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच 'NTEP अंतर्गत खासगी क्षेत्रासाठी क्षयरोग सेवा' या विषयावर विकास कुरणे (रीजनल कोऑर्डिनेटर, HLFPPT) यांनी माहिती देत खासगी डॉक्टरांची भूमिका, निक्षय (Ni-kshay) प्लॅटफॉर्मचा वापर व वेळेत निदान-उपचाराचे महत्त्व अधोरेखित केले. याशिवाय सतीश (PPM कोऑर्डिनेटर, रायगड) यांनी 'निक्षय मित्र' उपक्रमाची माहिती देत रुग्णांना पोषण व सामाजिक आधार देण्यासाठी या योजनेचे महत्त्व स्पष्ट केले.

# सुधीर मुंबईकर यांना सेवानिरोप

**उरण : बातमीदार**

जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट संस्था, विद्या संकुल मोरा उरण येथील मुख्याध्यापक सुधीर शांताराम मुंबईकर हे ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा सोमवारी शाळा समितीचे चेअरमन परशुराम मोतीराम कोळी यांच्या अध्यक्षतेखाली मोरा येथे विद्या संकुलात झाला.



यावेळी जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक तथा पनवेल महानगर पालिकेचे माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, न्हावा ग्रामपंचायतचे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, शिक्षणाधिकारी निर्मला घरत, माध्यमिक मराठी माध्यम शाळेचे चेअरमन पी एम कोळी, प्राथमिक मराठी शाळेचे चेअरमन चंद्रकांत कोळी, इंग्लिश मिडीयम स्कुलचे चेअरमन दिलीप मुंबईकर, शाळा कमिटीचे मेंबर बी पी म्हात्रे, आर के पाटील, के एस शिंगटे, आर बी कोळी, राजश्री कोळी, मुख्याध्यापक साईनाथ गावंड, मनोज म्हात्रे, इंग्लिश मिडीयम स्कुलचे मुख्याध्यापक संध्या ठाकूर आदी उपस्थित होते.

# कोळी समाज संघटनेची राज्य कार्यकारिणी बैठक

**ठाणे : प्रतिनिधी**

अखिल भारतीय कोळी समाज संघटनेची महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी बैठक २८ मार्च २०२६ रोजी ठाणे येथील कोळी समाज भवन या संघटनेच्या भव्य इमारतीमधील सुसज्ज सभागृहात केंद्रीय कार्यकारिणीचे राष्ट्रीय महामंत्री (कार्याध्यक्ष) मनुभाई चावडाजी यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



मनुभाई चावडाजी यांनी आपल्या भाषणात कोळी समाजाच्या सर्वात महत्त्वाचा विषय जो अनुसूचित जमातीच्या दाखला या संदर्भात २१ जून रोजी दिल्ली येथील अधिवेशनात आपले माजी राष्ट्रीय अध्यक्ष रामनाथ कोविंदसाहेब यांच्या समवेत मंत्री अमित शहा साहेबांना या विषयाचं गांभीर्य लक्षात आणून या संदर्भात ठोस उपाययोजना करण्यास भाग पाडू असं आश्वासन संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीला दिले.

या बैठकीत मनुभाई चावडाजी यांच्या सह डी.जी.शंखवारजी, केंद्रीय उपाध्यक्ष महादेव बुवा शाहबाझकर, केंद्रीय सचिव पुष्पाताई मढवी, महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीचे अध्यक्ष परेश कोळी, कार्याध्यक्ष सिद्धार्थ कोळी, उपाध्यक्ष विश्वनाथ कोळी, उपाध्यक्ष दत्ताभाऊ सुरवसे, महिला अध्यक्ष स्नुतिका मोरेकर आणि महाराष्ट्रातील सर्व जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्लिक...क्लिक...!



श्रीवर्धन : रणरणत्या उन्हात झाडांची किंमत कळते. श्रीवर्धन-बोर्ली मार्गावर एक पसरलेले झाड व त्याची सावली टिपली आहे अमेय नाझरे यांनी.

# उरण तालुका शेतकरी गट समूहाचे प्रशिक्षण

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत उरण तालुका आणि श्रीवर्धन तालुका शेतकरी गट समूहाचे प्रशिक्षण काल २७ मार्च रोजी रोहा येथील श्री विवेकानंद रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टिट्यूट येथे संपन्न झाले.



नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत तालुका कृषी उरण आणि प्रकल्प संचालक आत्मा रायगड यांच्या खात्यामार्फत हे शेतकरी गटाचे एक दिवशीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षणात नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत घरच्या घरी शेतीला लागणारी खते आणि औषधे व पेरणी अगोदर बीज प्रक्रिया कशी करायची याची प्रात्यक्षिके या प्रशिक्षणात दाखविण्यात आली. यावेळी प्रसाद दगडे यांनी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती विषयीचे उत्तम मार्गदर्शन केले. रासायनिक खतांच्या वापरामुळे शेतकऱ्यांना दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. यातून त्यांचे आर्थिक नुकसान होते.

या दुष्परिणामांना थोपविण्यासाठी पारंपारिक नैसर्गिक शेती करणे हा एक उत्तम उपाय आहे. त्यासाठी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली नैसर्गिक शेतीसाठी लागणारी खते, औषधे व बियाणांचा वापर योग्य पद्धतीने कसा करायचा, याची प्रात्यक्षिके या प्रशिक्षण शिबिरात दाखविण्यात आली.

# मासेमारी व्यवसाय संकटात

## श्रीवर्धनमध्ये अनेक बोटी किनाऱ्यावर उभ्या

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

हवामान बदल आणि डिझेल दरात झालेल्या दरवाढीमुळे श्रीवर्धन तालुक्यातील मच्छीमार आर्थिक संकटात सापडला आहे. अनेक यांत्रिक बोटी किनाऱ्यावरच उभ्या राहिल्या असून समुद्रात जाण्यापेक्षा बोट थांबवणे स्वस्त अशी वेळ मच्छीमारांवर आली आहे.

जीवना बंदर, मुळगाव कोळीवाडा, बागमांडला, दिघी, कुडगाव, आदगाव, शेखाडी, भरडखोल आणि दांडा कोळीवाडा या किनारी पट्ट्यात अनेक बोटी सध्या निष्क्रिय अवस्थेत उभ्या असल्याचे चित्र दिसत आहे.

हवामानात सातत्याने बदल होत आहे. त्याचा परिणाम मासेमारीवर होत आहे. त्याचप्रमाणे डिझेल दरात प्रति लिटर सुमारे २२ रुपयांपर्यंत वाढ झाल्याने एका फेरीसाठी लागणारा इंधन खर्च प्रचंड वाढला आहे. पूर्वी परवडणारा मासेमारीचा खर्च आता तोट्यात जात असल्याने अनेकांनी समुद्रात जाणेच बंद केले आहे.

दरम्यान, राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांनी या परिस्थितीची दखल घेत केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांना पत्राद्वारे माहिती दिली आहे. त्यामुळे मच्छीमारांना दिलासा मिळण्याची आशा आहे.



मच्छीमारांच्या समीकरणानुसार एका बोटीला समुद्रात जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात डिझेल लागते. पूर्वीचा खर्च आणि सध्याचा खर्च यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. त्यातच मासळीचे उत्पादन घटले आहे. बाजारभाव स्थिर नाहीत. शिवाय मजुरी व देखभाल खर्च वाढला आहे. यामुळे खर्च जास्त आणि उत्पन्न कमी अशी स्थिती निर्माण झाली आहे.

मत्स्यव्यवसाय हा अन्नसुरक्षा, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. तरीदेखील, शेतीप्रमाणे इंधनावर कोणतेही स्थिर अनुदान किंवा संरक्षणात्मक धोरण उपलब्ध नाही. सहकारी संस्थांना 'बल्क कन्झ्युमर' म्हणून वर्गीकृत केल्यामुळे मच्छीमारांना किरकोळ ग्राहकांपेक्षा जास्त दराने डिझेल घ्यावे लागते, जे पूर्णपणे अन्यायकारक असल्याचे जाणकारांचे मत आहे. हा मुद्दा कायद्याच्या आणि धोरणात्मक चौकटीत गंभीर दखल घेण्यासारखा असल्याचे म्हटले जात आहे.

या संकटाचा परिणाम केवळ मच्छीमारांपुरता मर्यादित नसून बोटींवरील कामगार, मासळी विक्रेते, वाहतूकदार, बर्फ उद्योग व प्रक्रिया उद्योग या सर्व घटकांवर झाला आहे. परिणामी हजारो कुटुंबांची उपजीविका धोक्यात आली आहे.

'बल्क कन्झ्युमर' वर्गीकरण रद्द करून किरकोळ दर लागू करावेत, थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना राबवावी, मत्स्यव्यवसायासाठी स्वतंत्र इंधन धोरण तयार करावे, अशा मागण्या मच्छीमारांच्या आहेत. त्याचप्रमाणे या गंभीर परिस्थितीत खासदार सुनील तटकरे यांनी तातडीने लक्ष घालून केंद्र स्तरावर ठोस निर्णयासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा मच्छीमारांकडून व्यक्त होत आहे.

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर आला असताना आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या मच्छीमारांसाठी ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास संपूर्ण मत्स्यव्यवसाय साखळीवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### नैसर्गिक आपत्तींचा फटका

***यावर्षी समुद्रातील बदलते वातावरण, दक्षिणेकडील खराब हवामान तसेच वारंवार येणाऱ्या वादळांचा मोठा परिणाम मासेमारीवर झाला आहे. खोल समुद्रात जाऊनही अनेकदा मासळी मिळत नसल्याने मच्छीमारांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. यामुळे अनेक मच्छीमार कर्जाच्या विळख्यात अडकण्याच्या मार्गावर आहेत. त्यातच डिझेल दरवाढ झाल्याने अवस्था आणखी बिकट झाल्याचे चित्र आहे.***

# राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेत कर्जतच्या लॉ कॉलेजचे यश

**नेरळ : प्रतिनिधी**

कायद्याच्या शिक्षणाला प्रत्यक्ष न्यायालयीन प्रक्रियेची जोड देणाऱ्या राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धा २०२६मध्ये कर्जत तालुक्यातील आचार्य मंजुनाथ लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत सर्वोत्कृष्ट न्यायालयीन शिष्टाचार हा पुरस्कार पटकावला. रायगड जिल्ह्यात कायदेविषयक शिक्षणाची परंपरा अधिक बळकट करणारी ही कामगिरी मानली जात आहे.

मुंबईच्या वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय स्तरावर आयोजित या स्पर्धेत विविध भागांतील सुमारे ३० विधी महाविद्यालये सहभागी झाली होती. प्रत्येक महाविद्यालयातून त्रिसदस्यीय विद्यार्थी गटांनी सहभाग घेत न्यायालयीन प्रक्रियेप्रमाणे आपले युक्तिवाद मांडले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना कायदेविषयक ज्ञान, न्यायालयीन मांडणी, शिष्टाचार, सादरीकरण आणि वकिली कौशल्य यांची प्रत्यक्ष कसोटी अनुभवता आली.

यंदाच्या मूट कोर्ट स्पर्धेसाठी 'अंमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थांचा वापर' या गंभीर आणि सामाजिक विषयावर आधारित प्रकरण देण्यात आले होते. या विषयात एका बाजूने आरोपीची बाजू प्रभावीपणे मांडून त्याला कायदेशीर संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला, तर दुसऱ्या बाजूने त्याच आरोपीला कायद्याच्या कसोटीवर दोषी ठरवण्यासाठी ठोस युक्तिवाद सादर करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण स्पर्धा अत्यंत चुरशीची, बौद्धिकदृष्ट्या समृद्ध आणि न्यायालयीन वातावरणाची खरी अनुभूती देणारी ठरली.

या स्पर्धेत आचार्य मंजुनाथ विधी महाविद्यालय, कर्जत शेलू येथील बीएएलएलबी विभागातील उल्हास प्रकाश चंदने, ऋतम साळुंखे आणि अस्मिता पेमारे या विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण, कायद्यावरील पकड आणि न्यायालयीन शिस्तीचे उत्कृष्ट पालन करत परीक्षकांची विशेष दाद मिळवली. त्यांच्या व्यावसायिक सादरीकरणामुळे आणि न्यायालयीन वर्तनातील शिस्तबद्धतेमुळे त्यांना सर्वोत्कृष्ट न्यायालयीन शिष्टाचार हा पुरस्कार बहाल करण्यात आला.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी पी.ई.सोसायटीचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, सचिव संजीव बौधंकर, प्रभारी प्राचार्य डॉ. डी.ए. गवई तसेच समन्वयक व उपप्राचार्य प्रा. एस. सुभाषचंद्र यांची उपस्थिती लाभली.

या यशाबद्दल आचार्य मंजुनाथ लॉ कॉलेजचे अध्यक्ष मंजुनाथ आचार्य, प्राचार्य किशोर गायकवाड तसेच प्रा. किर्ती वाडेकर-बदले यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या यशामागील मेहनत, अभ्यासू वृत्ती आणि आत्मविश्वासाचे कौतुक केले.



# मुरूडमध्ये महावीर जयंती उत्साहात साजरी; भव्य शोभायात्रेने वेधले लक्ष

**मुरूड : प्रतिनिधी**

जैन धर्माचे २४वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती मुरुड शहरात उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने शहरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.



कडक उन्हं असल्याने सकाळी लवकर जैन मंदिरात भगवान महावीरांच्या मूर्तीला अभिषेक व विशेष पूजा-अर्चा करण्यात आली. त्यानंतर फुलांनी सजवलेल्या भव्य रथातून भगवान महावीरांच्या सुवर्णमयी मूर्तीची नगरपरिक्रमा काढण्यात आली.

या मिरवणुकीत जैन समाजातील आबालवृद्ध मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून "त्रिशला नंदन वीर की, जय बोलो महावीर की" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. पुरुष भाविकांनी पांढऱ्या वेशभूषेत मिरवणुकीची शोभा वाढवली. स्थानिक पोलीस प्रशासन आणि स्वयंसेवकांनी वाहतुकीचे चोख नियोजन केले होते. शोभायात्रेचा समारोप झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

महावीर जयंती व मिरवणुकीसाठी समाजाचे अध्यक्ष हसमुख जैन आणि सहकाऱ्यांनी सुंदर नियोजन केले. पोलीस निरीक्षक कांबळे व टीमने महावीर जयंतीनिमित्त सर्व जैन बांधवांना शुभेच्छा दिल्या.

# महड येथे रस्त्यावर खड्डा

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायत हद्दीतील महड गावातील शाळेकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर पडलेला खड्डा अपघाताला निमंत्रण देत आहे. त्याचबरोबर या ठिकाणी रस्त्याला तडा गेल्याचे पहावयास मिळत आहे. याच मार्गावरून शाळकरी मुले, ग्रामस्थ प्रवास करीत असतात. संबंधित प्रशासनाने याचे गांभीर्य ओळखून रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# पेन्शनधारकांचे मागण्यांबाबत निवेदन

**रोहा : प्रतिनिधी**

ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचे श्रम व रोजगारमंत्री मनसुख मांडविय यांना अग्रेसित केलेले ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या न्याय मागण्यांबाबतचे निवेदन गोळीबार मैदान पुणे येथील भविष्य निर्वाह निधी संघटन क्षेत्रीय आयुक्त अमित वसिष्ठ यांच्यामार्फत देण्यात आले.

निवेदन देतेवेळी ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचे पुणे शहराध्यक्ष मोहन शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष शंकर शेवकर, सचिव बाळासाहेब गावडे, कोषाध्यक्ष प्रमोद पाटील, शहर कोषाध्यक्ष मुकुंद खटावकर, कार्यकर्ते चंद्रकांत सातव, यादव तांबे, रोहा येथील नंदकिशोर भादेकर आदी उपस्थित होते. यावेळी निवेदन मंत्रीमहोदयांकडे पाठविण्याबाबत चर्चा करून क्षेत्रीय आयुक्तांना विनंती करण्यात आली.



# माणगावच्या तटकरे महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेला प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द.ग.तटकरे महाविद्यालयात वाणिज्य व बॅफ विभाग तसेच आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने नवोन्मेषाच्या युगातील वाणिज्य, व्यवस्थापन आणि डिजिटल अर्थव्यवस्थेतील उदयोन्मुख प्रवाह या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय स्तरावरील परिषद उत्साहात पार पडली.



खेड येथील आयसीएस कॉलेज, ज्ञानदीप कॉलेज, सिद्धयोग लॉ कॉलेज आणि तुकाराम बाबुराव कदम कॉलेज यांच्या सहकार्याने आयोजित या परिषदेला विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. परिषदेचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

उद्घाटन सत्रात प्रमुख अतिथी म्हणून ॲड.टी.एल. डफळे (संचालक, तुकाराम बाबुराव कदम कॉलेज, खेड-रत्नागिरी) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी.एम. खामकर होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. चंद्रशेखर साळुंखे, डॉ. विश्वास देशमुख (प्राचार्य, एसएनडीटी एसीएस कॉलेज, कोलाड), प्रा. दानिश संगे (प्राचार्य, अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री अँड कॉमर्स कॉलेज, श्रीवर्धन), प्रा. विनोद साळुंखे (प्राचार्य, तुकाराम बाबुराव कदम कॉलेज, खेड) तसेच उपप्राचार्य डॉ. आर. एम. आचार्य आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात नवोन्मेष, डिजिटल अर्थव्यवस्था आणि संशोधन क्षेत्रातील वाढत्या संधींचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना नवे दृष्टिकोन दिले.

यानंतर तांत्रिक सत्रांना सुरुवात झाली. पहिल्या सत्रात तज्ज्ञ वयांनी वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील बदलते प्रवाह सविस्तर मांडले. दुसऱ्या सत्रात विविध विषयांवर संशोधन सादरीकरणे करण्यात आली. विद्यार्थ्यांनीही सहभाग घेत शोधनिबंध सादर केले. दुपारच्या भोजनानंतर तिसरे व चौथे सत्र पार पडले. समारोप सत्रात मान्यवरांच्या हस्ते सहभागी संशोधकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी आयक्यूएसी विभाग प्रमुख डॉ.जे.आर. पांडेय यांनी आभार प्रदर्शन करून परिषदेचा समारोप केला. परिषद यशस्वी करण्यासाठी वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. अमरीन आडकर, बॅफ विभाग प्रमुख प्रा. सुम्मैया अन्सारी, आयक्यूएसी विभाग प्रमुख डॉ.पांडेय, प्रा. आदिल बडे, प्रा. स्वप्नील सकपाळ, प्रा. देवांक परब, प्रा. श्रावणी बक्कम, प्रा. अश्विनी शेलार आदींनी परिश्रम घेतले.

# शंभर वर्षांची परंपरा असलेली कर्जतमधील मिरचीची बाजारपेठ

**कर्जत : प्रतिनिधी**

मसाल्याच्या पदार्थांसाठी कर्जतच्या बाजारात मिळणाऱ्या मिरचीला महिलांची पसंती असते. त्यामुळे गेल्या १०० वर्षांपासून कर्जत येथील बाजारपेठ मिरचीसाठी प्रसिद्ध आहे. रायगडच नव्हे; तर ठाणे, पुणे, मुंबईहूनसुद्धा या बाजारात वर्षानुवर्षे ग्राहक येतात आणि आपल्या आवडीची मिरची आणि मसाले खरेदी करतात. उन्हाचा पारा जसा वाढला आहे तशी महिलांची मिरची खरेदी करण्यासाठी गर्दी वाढली आहे. गेल्या वर्षापेक्षा दर दीडपट-दुप्पट असल्याने असल्याने मिरचीचा ठसका खूपच झाला आहे.



हल्ली तयार मसाले बाजारात मिळत असले तरी मिरची खरेदी करून मसाल्याचे पदार्थ त्यात टाकून तिखट मसाला बनविण्याची परंपरा कायम आहे. आपण तयार केलेले मसाले जास्त दिवस टिकतात असे अनेकांचे म्हणणे आहे. अशी कुटुंब वर्षभरासाठी मसाला तयार करून ठेवतात. ग्रामीण भागात ज्यांच्या घरी लग्नकार्य आहे अशा कुटुंबात साधारण वीस ते पंचवीस किलो मसाला करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. हा बाजार चार ते पाच महिने असतो आणि त्यात सुमारे दोन-अडीच कोटी रुपयांची उलाढाल होत असते.

थंडी कमी झाली की मिरची विकत घेण्यासाठी अगदी पेण, अलिबाग, पनवेल, बदलापूर, कल्याण, डोंबिवली, मुरबाड, शहापूर, लोणावळा, पुणेसह मुंबईतूनही ग्राहक येत असतात. परदेशातही आपल्या नातेवाईकांना कर्जतमधून मिरची घेऊन मसाला तयार करून पाठवण्याचे प्रमाण लक्षणीय आहे.

> ***मी ८२ वर्षाचा असून ६०-६२ वर्षे कर्जत शहरात मिरची विकत असून जनतेचा विश्वास आम्ही मिळविला आहे, मात्र आमच्या नंतर पुढील पिढी या व्यवसाय करीलच याची खात्री नाही. तरीदेखील पंकज व सचिन ही दोन्ही मुले आणि सुनीता, टिना या दोन्ही सूना मदतीला असतात. त्यामुळे वर्षाकाठी ८०० पोती मिरची विकण्यास मदत होते.***
>
> **-जयंतीलाल परमार, मिरची व्यापारी**

यंदा किमतीच्या बाबतीत मिरची खूपच 'तिखट' झाली आहे, परंतु तरीही मिरची व खडे मसाले घेण्यासाठी बहुतांश दुकानात ग्राहकांची गर्दी असते. कर्जत शहरातील महावीर पेठेत १०-१२ दुकानांमध्ये मिरची व खडे मसाले विक्रीसाठी असतात.

# भातसई येथील महादेवी मातेची आज यात्रा



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात ठिकठिकाणी जत्रा, यात्रा उत्सवाला सुरुवात झाली असून भातसई येथील महादेवी मातेची (महादाई) यात्रा १ एप्रिल रोजी होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या अवचितगडाच्या पायथ्याशी अनेक पुरातन मंदिरे आहेत. त्यातीलच भातसई येथील महादेवी माता (महादाई) मंदिर होय. भातसई हे निसर्गाच्या कुशीत वसलेले टुमदार गाव. येथील मूळ देवी पूर्वी भवानी म्हणून ओळखली जायची. महादेवीचे नवीन मंदिर १९०७ साली गावकऱ्यांनी श्रमदानातून बांधले.

यात्रेच्या दिवशी परिसरातील महादेवाच्या काठ्या ताशा, खालुबाजा या पारंपरिक वाद्यांवृंदवर गळ टोचणी या मुख्य कार्यक्रमाच्या ठिकाणी मंदिरात येतात. जत्रेच्या प्रमुख विधीला येथूनच सुरुवात होते. महादेवीचा गळ टोचून घेण्याचा मान पंचक्रोशीसह महाराष्ट्रातील भक्तांना दिला जातो. या दिवशी मंदिर परिसरात जत्रा भरते.

# कर्जतमध्ये अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद प्रभाग क्रमांक १०मधील धर्ती बिल्डिंग ते दगडे चाळदरम्यानच्या रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. या रस्त्याचे डांबरीकरण होणार असल्याने येथील रस्त्याचा प्रश्न सुटणार आहे.

भिसेगाव येथील धर्ती बिल्डिंग ते दगडे चाळ या रस्त्याचे भूमिपूजन नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. या कार्यक्रमास नगरसेवक अशोक राऊत, महेंद्र चंदन, हर्षाली गायकवाड, हरिश्चंद्र दगडे, सुनील चव्हाण आदी नागरिक उपस्थित होते. या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी आठ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. नगर परिषद स्थापन झाल्यापासून पहिल्यांदाच या रस्त्याचे डांबरीकरण होणार आहे.



# राजस्थानचा ‘रॉयल’ विजय!

## चेन्नई सुपर किंग्सच्या पदरी लाजिरवाणा पराभव

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या हंगामातील तिसऱ्या सामन्यात राजस्थान रॉयल्सच्या संघाने पाच वेळचा चॅम्पियन चेन्नई किंग्सचा धुव्वा उडवत नवा इतिहास रचला आहे. नांद्रे बर्गर, जोफ्रा आर्चर आणि रवींद्र जडेजाच्या दमदार गोलंदाजीच्या जोरावर राजस्थानच्या संघाने चेन्नईला अवघ्या १२७ धावांवर रोखले. या धावसंख्येचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशीचे धमाकेदार अर्धशतक आणि सलामीवीर यशस्वी जैस्वालसह कर्णधार रियान परागच्या कडक बॅटिंगच्या जोरावर राजस्थानने १२८ धावांचे लक्ष्य १३व्या षटकातील पहिल्या चेंडूवर आठ विकेट्स राखून पार केले.



आयपीएलच्या इतिहासातील राजस्थान रॉयल्सचा हा सर्वात मोठा विजय ठरला. याउलट चेन्नई संघावर सर्वात मोठ्या पराभवाची नामुष्की ओढावली. रियान परागने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतल्यावर राजस्थानच्या गोलंदाजांनी चेन्नई सुपर किंग्सच्या आघाडीला सुरूंग लावला.

राजस्थानच्या नांद्रे बर्गर याने संजू सॅमसन याला अवघ्या सहा धावांवर तंबूचा रस्ता दाखवला. त्यानंतर जोफ्रा आर्चर पिक्चरमध्ये आला. त्याने चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाडला सहा धावांवर माघारी धाडले. युवा आयुष म्हात्रेला बर्गरने खातेही उघडू दिले नाही. संदीप सर्माने मॅथ्यू शॉर्टला अवघ्या दोन धावांवर माघारी धाडले. रवींद्र जडेजाने एकाच षटकात सरफराज खान १७ (१२) आणि शिवम दुबे ६ (४) धावांवर बाद करत चेन्नईची अवस्था बिकट केली. अवघ्या ५७ धावांवर चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने सहा विकेट्स गमावल्या होत्या.

चेन्नईकडून धोनीच्या जागी पदार्पणाची संधी मिळालेल्या कार्तिक शर्माने तग धरण्याचा प्रयत्न केला, पण तोही १८ धावांवर बाद झाला. अखेरच्या षटकात जेमी ओव्हर्टन याने ३६ चेंडूत केलेल्या ४३ धावांच्या खेळीच्या जोरावर चेन्नई संघाच्या १९.४ षटकात १२७ धावांवर झाल्या.

अल्प धावसंख्येचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशी पहिल्या षटकापासून चेन्नईच्या गोलंदाजावर तुटून पडला. त्याने १७ चेंडूत चार चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ५२ धावांची खेळी करत चेन्नईला बॅकफूटवर ढकलले. ध्रुव जुरेल नऊ चेंडूत १८ धावा करुन परतल्यावर सलामीवीर यशस्वी जैस्वाल ३६ चेंडूत तीन चौकार आणि एका षटकारांच्या मदतीने नाबाद ३८ धावा आणि रियान परागने ११ चेंडूत एक चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने नाबाद १४ धावांसह १३व्या षटकातील पहिल्या चेंडूवरच मॅच संपवली.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत उरण संघाची बाजी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील श्री नागेश्वर क्रीडा मंडळ आवास आयोजित स्व. प्रभाकर राणे स्मृती चषक ४५ वर्षांवरील कबड्डी स्पर्धा नुकतीच रंगली. या स्पर्धेत गणेश क्लब उरण संघ विजेतेपदाचा मानकरी ठरला.

स्पर्धेचा शुभारंभ आवास सरपंच अभिलाषा राणे, पं.स. उपसभापती प्रिया भगत, ग्रामपंचायत सदस्य सुहासिनी राणे, संचिता राऊळ, माजी पं.स. सदस्य व ज्येष्ठ खेळाडू रंजित राणे, माजी सरपंच अभिजित राणे यांच्या हस्ते झाले. स्पर्धेस आमदार महेंद्र दळवी, जि.प सदस्य दिलीप भोईर, पिंट्या गायकवाड यांनी यांनी सदिच्छा भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.



स्पर्धेकरिता दोन भव्य क्रीडांगणे आणि प्रेक्षकांना बसण्यासाठी गॅलरी व्यवस्था करण्यात आली होती. द्वितीय क्रमांक जय म्हसोबा संघ शहापूर, तृतीय बोरी व चतुर्थ क्रमांक मरीदेवी बांधण संघाने प्राप्त केला. वैयक्तिक बक्षिसे सर्वोत्कृष्ट खेळाडू भारत पाटील (उरण), उत्कृष्ट चढाई संतोष पाटील (शहापूर), उत्कृष्ट पकड विनोद काजरेकर (बांधण), पब्लिक हिरो कपिल म्हात्रे (बोरी) या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण माजी सरपंच अभिजित राणे, प्रा. प्रमोद भगत, निवास भगत, गणेश राणे व नागेश्वर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाले.

# महाडमध्ये महिलांच्या क्रिकेट स्पर्धेत स्टार संघ विजेता



**महाड : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महाड येथील महिला क्रिकेट कट्टा ग्रुपच्या वतीने खास महिलांसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन भिलारे मैदानात करण्यात आले होते. या स्पर्धेत स्टार क्रिकेट ग्रुप संघाने विजेतेपद पटकावले.

स्पर्धेत नऊ संघांनी सहभाग घेतला. पंचायत समिती ग्रुपने द्वितीय, तर वूमन स्टार ग्रुपने तृतीय क्रमांक प्राप्त केला. मालिकावीर स्वरा वाढवळ, उत्कृष्ट फलंदाज करुणा कदम, तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून मृणाली पारधी यांची निवड करण्यात आली. विजेते संघ व चमकदार कामगिरी केलेल्या खेळाडूंना महाड नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महिला क्रिकेट कट्टा ग्रुपच्या सदस्य पूजा जगताप, मनीषा सकपाळ, अश्विनी पाडळकर, हर्षाली शिर्के, वर्षा जामसुदकर, वर्षा मोरे, ज्योती नाक्ते, प्रिती देशमुख, रूपाली पवार यांनी विशेष मेहनत घेतली. या स्पर्धांसाठी पंच म्हणून अमर सकपाळ व निलेश साळुंखे यांनी काम पाहिले तर नवीन परमार व परेश गांधी यांनी स्पर्धांची उत्तम अशी कॉमेंट्री केली.

# वैभव सूर्यवंशीचे धमाकेदार अर्धशतक

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सचा युवा सलामीवीर वैभव सूर्यवंशी याने नव्या हंगामाची सुरुवातही एकदम धमाकेदार अंदाजात केली आहे. चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यात १५ वर्षीय वैभवने बॅक टू बॅक षटकार मारत १५ चेंडूत अर्धशतक साजरे केले. राजस्थानच्या संघाकडून हे दुसरे सर्वात जलद अर्धशतक ठरले.

वैभवने या सामन्यात चार चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने १७ चेंडूत ५२ धावांची खेळी केली. अंशुल कंबोज याने त्याच्या वादळी खेळीला ब्रेक लावला. सरफराज खान याने उत्तम झेल घेत युवा बॅटरला तंबूचा रस्ता दाखवला.

राजस्थान संघाकडून सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रम हा यशस्वी जैस्वालच्या नावे आहे. २०२३च्या हंगामात त्याने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध अवघ्या १३ चेंडूत अर्धशतक ठोकले होते. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर पुन्हा एकदा वैभव सूर्यवंशीचं नाव दिसते. गत हंगामात जलद शतकी खेळीचा विक्रम नोंदवताना त्याने गुजरात टायटन्सविरुद्ध १७ चेंडूत अर्धशतक साजरे केले होते.

# रायगडच्या पुरुष व महिला कबड्डी संघांचे प्रशिक्षण उत्साहात



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या पुरुष व महिला संघांचे प्रशिक्षण शिबिर श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे खांदा कॉलनीतील सीकेटी कॉलेजच्या मैदानावर नुकतेच झाले. त्यास उत्तम प्रतिसाद लाभला.

या शिबिराचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक तथा रायगड जिल्हा पंच मंडळाचे प्रमुख शरद कदम यांच्या हस्ते झाले होते. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष हिराचंद पाटील, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सुर्यकांत ठाकूर, संघ प्रशिक्षक तथा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रमोद म्हात्रे, असोसिएशनचे सहसेक्रेटरी तथा राष्ट्रीय खेळाडू संजय मोकल, महिला संघ व्यवस्थापक तथा असोसिएशनचे सदस्य नरेश म्हात्रे, सीकेटी कॉलेजचे क्रीडा प्रमुख विनोद नाईक, रायगड भूषण पुरस्कार प्राप्त तथा राष्ट्रीय कबड्डी पंच हिरामण भोईर, महिला संघ प्रशिक्षिका व राष्ट्रीय खेळाडू ऋणाली मोकल, श्री.गोटू, जयेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर झाले.

यावेळी खेळाडूंना मार्गदर्शन करताना शरद कदम म्हणाले की, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी या ठिकाणी शिबिर भरवून खेळाडूंना चांगल्या प्रकारे सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्याचा फायदा घेत खेळाडूंनी राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत चांगला खेळ करून विश्वास सार्थ ठरवावा.

सर्व खेळाडूंची, राहण्याची, जेवणाची तसेच सर्व खेळाडू, प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक यांना किट बॅग, बूट, ट्रॅकसुट दिल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे श्री. कदम यांनी आभार मानून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# गुलाबी जर्सीत जडेजाने जपली ‘यलो फॉरेव्हर’ची भावना

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या हंगामात राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यातून उतरलेला रवींद्र जडेजा मागील १२-१३ वर्षी सीएसकेचा चेहरा होता, पण ट्रेड डीलमुळे त्याचा संघ बदला अन् तो पुन्हा राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यात गेला. त्यामुळेच आयपीएलच्या यंदाच्या हंगामातील गुवाहटीच्या मैदानातील सामन्यात रवींद्र जडेजा भावूक झाल्याचे पहायला मिळाले.


गुवाहटी बरसापारा क्रिकेट स्टेडियममध्ये जर्सी बदलून मैदानात उतरल्यावर रवींद्र जडेजाने खलील अहमदच्या जर्सीवरील सीएसके लोगोला किस करत जुन्या संघाला मिस करतोय ते दाखवून दिले. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.







वर्ष २१ वे



ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।

विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।

सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।

तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**

वै. ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (खारकोपर) यांच्या उपस्थितीत.





## अखंड हरिनाम सप्ताह

### ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा

व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

**प्रारंभ** चैत्र शुद्ध १३, मंगळवार, दि. ३१/३/२०२६

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वाजता

**सांगता** चैत्र कृ. ५, मंगळवार, दि. ७/४/२०२६

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु.ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, मंगळवार दि. ३१/०३/२०२६ ते चैत्र कृ. ५ मंगळवार दि. ७/०४/२०२६ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

### दैनंदिन कार्यक्रम

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.०० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०७.३० ते ०९.३० वा. - कीर्तन

**बुधवार, दि. ०१/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. दिपक महाराज (कुंडेगाव)
हरिपाठ - श्री गणेश हनुमान हरिपाठ मंडळ, कुंडेगाव
किर्तनकार - ह.भ.प. श्रीकांत महाराज दुराफे (आळंदी - देवाची)
स्मरणार्थ - कै. सविता शिवाजी देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**गुरुवार, दि. ०२/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. मनीज महाराज (बेलपाडा)
हरिपाठ - भैरवनाथ हरिपाठ मंडळ, धुतूम
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. मारुती महाराज कोलाटकर (देवकान्हे-रोहा)
सौजन्य -सौ. श्रध्दा रमेश ठाकूर (खारकोपर)

**शुक्रवार, दि. ०३/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. राजेंद्र गुरुजी (कुंडेगाव)
हरिपाठ - शिवशंभी हरिपाठ मंडळ, कुंडेगाव
किर्तनकार - ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे (गणेगाव- कर्जत)
स्मरणार्थ - कै. शिवाजी गजानन पाटील
सौजन्य - सौ. ललिता सुनिल पाटील (खारकोपर)

**शनिवार, दि. ०४/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प.अशोक महाराज (बामणडोंगरी)
हरिपाठ- जय हनुमान प्रासादिक हरिपाठ मंडळ, बामणडोंगरी
किर्तनकार - ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (आळंदी-देवाची)
स्मरणार्थ - कै. गिताबाई त्रिंबक देशमुख
सौजन्य - श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण)

**रविवार, दि. ०५/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. रोशन महाराज ठाकूर (बेलपाडा)
हरिपाठ - श्री कृष्ण हरिपाठ मंडळ, बेलपाडा
किर्तनकार - ह.भ.प. भगिरथ महाराज काळे (सिन्नर)
स्मरणार्थ - कै. शिवाजी रघुनाथ देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**सोमवार, दि. ०६/४/२०२६**
सकाळी ८.३० वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन
सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा
सामुदायीक हरिपाठ
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. चारुदत्त महाराज आफळे (पुणे)
स्मरणार्थ - कै. यमुना वसंतशेठ पाटील
सौजन्य - ह.भ.प. वसंतशेठ हरि पाटील (खारकोपर)

**काल्याचे कीर्तन:** मंगळवार, दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे (नाशिक),
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com